# उन्मेष

काव्य विशेषांक

२०२१-२२



शेगांव शिक्षण संस्था, शेगांव द्वारा संचालित

## सेठ ग.भि. मुरारका कला वाणिज्य
## महाविद्यालय, शेगांव


**प्रकाशक**
प्राचार्य, सेठ ग.भि. मुरारका कला वाणिज्य
महाविद्यालय, शेगांव, जि. बुलडाणा

**अक्षर जुळवणी**
सौ.प्रियंका लोडम
गोकुळ कॉलनी, अकोला

मुद्रक
**मुक्ता ग्राफिक्स् अँड पब्लिकेशन**
रणपिसे नगर चौक, अकोला
मो. : ९८५०४७१५२०

**विद्यार्थ्यांच्या वितरणाकरिता**

**प्रकाशन वर्ष**
२०२१-२०२२



श्री संत सद्‌गुरु गजानन महाराज, शेगांव



स्व.श्रीमान सेठ पुरणमलजी मुरारका
संस्थापक
शेगांव शिक्षण संस्था, शेगांव



स्व.श्रीमान सेठ मुरारीलालजी चतरभुजजी मुरारका

अध्यक्ष

शेगांव शिक्षण संस्था, शेगांव

# अनुक्रमणिका

संपादकीय
प्राचार्यांचे मनोगत ...
संपादक मंडळ
– साहित्य विभाग –
वडील/कु. रेणुका सुरेश गणगणे, बी. ए. भाग १
घर/कु. रेणुका सुरेश गणगणे
आई–वडील/कु. रेणुका सु. गणगणे, बी.ए.भाग १
चारोळी/धनंजय पहुरकार, बी.कॉम. १
अविस्मरणीय /कु. पुजा टावरी, बी.कॉम.भाग ३
विद्यार्थ्यांचे आजचे कर्तव्य/कु. साधना सावदेकर, बी. ए. भाग १
आई/कु. राधा विष्णु कलोरे, बी. ए. भाग १
जग / कु. वर्षा घेंगे, बी. ए. २
म्हणी / कु.राधा विष्णू कलोरे, बी.ए.भाग 1
जीवन कसे जगायला पाहीजे/मंगेश सुदामा बाभुळकर, बी. कॉम भाग १
मैत्री / माधव अ. जोशी, बी.कॉम. भाग १
शायरी / कु. शारदा श्रीराम पारेकर, बी. ए. २
आई / कु. लक्ष्मी खेन्ते, बी. कॉम. १
ध्येय / कु. लक्ष्मी खेन्ते, बी. कॉम. १
मागणी / भुषण शरदराव खुमकर, बी. कॉम. २
बोल मित्रा /भूषण शरदराव खुमकर, बी.कॉम.2
गोरा / धिरज सुरेश शेगोकार, बी. ए. २
प्रार्थना / कु. पुजा गजानन नायसे, बी. ए. २
स्वप्न / शाम प्रभाकर शेगांवकर, बी. ए. ३
बेटी / कु. पुजा अ.खलेलकर, बी.कॉम.१
आई /कु. पुजा अ.खलेलकर, बी.कॉम.१
माँ–बाप / कु. पुजा अ.खलेलकर, बी.कॉम.१
नशीब /कु. पुजा अ.खलेलकर, बी.कॉम.१
जिलो आज/कु. पुजा अ.खलेलकर, बी.कॉम.१
मैत्री म्हणजे/कु. पुजा अ.खलेलकर, बी.कॉम.१
मैत्री / कु. पुजा अ.खलेलकर, बी.कॉम.१
जीवनाचे सार/कु. पुजा अ.खलेलकर, बी.कॉम.१
मैत्री /कु.चैताली गजानन महाजन, बी. ए. ३
माय / पवन ग. फुटवाईक, बी. कॉम २
मिठीत तुझ्या / पवन ग. फुटवाईक, बी. कॉम २
जगाचा पोशिंदा/पवन ग. फुटवाईक, बी. कॉम २
देशी नाई भेटली तर गावरानचं पितो / पवन ग. फुटवाईक, बी. कॉम २
पण.../ कु. शारदा श्रीराम पारेकर, बी. ए. २
दवबिंदूवर / परमेश्वर शेजोळे, बी. ए. २
चारोळी/पंकज नरोडे, बी. ए. २
थांबणारे संपणार / परमेश्वर शेजोळे, बी.ए. २
कवी/भुषण लंके, बी. ए. २
शायरी/राजेश बेलुरकर, बी.ए. २
प्रतिबिंब/ ऋषिकेश मसने, बी. ए. २
कमावलं की गमावलं /कु. पुजा ढगे, बी.ए.1
मैत्रीण/सिद्धार्थ राहणे, बी. ए. २
चकवे/परमेश्वर शेजोळे (महाराज), बी. ए. २
जीवन /शिवशंकर शेजोळे, बी. ए. १
तुझा मार्ग ओळख /संजय ह.चव्हाण, बी. कॉम. १
कधी तरी बोलशील /राजेश बेलुरकर, बी.ए.2
न्हाय गं आई नग तोडू माव शिक्षण/कु. रंजना पंडीत दोडे, बी. ए. १
माये बाबा/ परमेश्वर शेजोळे (महाराज), बी. ए. २
शेर शायरी/भुषण शरदराव खुमकर, बी. कॉम. २
आई/विठ्ठल सु. खेडकर, बी. कॉम. २
असा कसा विसरला/संजय चव्हाण, बी. कॉम १
ओठावरील हास्य/विठ्ठल खेडकर, बी. कॉम. २
शेर शायरी/भुषण शरदराव खुमकर, बी.कॉम. २
गणित आयुष्याचे/विठ्ठल खेडकर, बी. कॉम. २
मैत्री/सुरेश लोणाग्रे, बी. ए. १

प्रेमगण /सुरेश लोणाग्रे, बी. ए. १
एस. एम. एस./भुषण खुमकर, बी.कॉम. २
निसर्ग/विठ्ठल सु. खेडकर, बी. कॉम. २
मोकाट गोर/भुषण शरदराव खुमकर, बी.कॉम.2
दारिद्रयाची माळ/भुषण खुमकर, बी.कॉम.2
सावित्रीबाई/हिवराज शा. वाकोडे, बी. ए. २
अशीच आहे मी /भारती ठाकरे, बी. ए. २
मैत्री/कु. अनिता सिरस्कार, बी. ए. २
का हो पुढारी/भुषण खुमकर, बी.कॉम. २
पांढर सोनं (कापूस)/भुषण खुमकर, बी.कॉम. २
ध्येय गठण/गणेश शेजोळे, बी. कॉम. १
My Father/Sharda S. Parekar, B.A. II

कुसुमाग्रजांच्या विशाखा या काव्यसंग्रहातील राष्ट्रविषयक कविता/ प्रा. डॉ. विनोद नामदेव इंगळे
राष्ट्रसंत तुकडोजींचे अलौकीक कार्य / प्रा. डॉ. विलास एम. डेहणकर
महाविद्यालयीन व्यवस्था /डॉ. व्ही. के. गायकवाड
करोनाची करनी / प्रा. गणेश वाघ शेगाव.
कोरोनाची भीती / प्रा. गणेश वाघ शेगाव.
संसाराचा गाडा / प्रा. गणेश वाघ शेगाव.

**अहवाल**

● मराठी विभाग अहवाल
● Report of English Department
● इतिहास अभ्यास मंडळ अहवाल
● राज्यशास्त्र विभाग अहवाल
● वाणिज्य अभ्यास मंडळाच्या अहवाल
● सांस्कृतिक विभाग
● शारीरिक शिक्षण विभाग
● ग्रंथालय विभाग अहवाल

# संपादकीय

वाचन, लेखन आणि अभिव्यक्ती ही मानवी सजिवांच्या विकासप्रणालीमध्ये महत्वाची भूमिका बजावणारी त्रिसूत्री होय. असे म्हटले तर वावगे ठरू नये. कारण माणूस हा त्यामुळेच निसर्गात उजवा ठरला हे विसरता येणार नाही. कारण निसर्ग घटकांचा विचार केला तर अनंत जीव या सृष्टी चक्रामध्ये जन्माला येतात ती कधी उपद्रवी तर कधी निरूपद्रवी या नात्याने परिचितही होवून जातात. परंतु कुठल्याही इतिहासाच्या पानाला ते वजनदार करून जात नाहीत. तुलनेत माणवप्राणी इतिहासाचा विषय होतो व इतिहास घडवतो ते त्याच्याजवळ असणाऱ्या विचार शक्तीनेच ना? त्या विचारांना आणखी प्रवाही करण्याच्या प्रवाहाचा त्या हलकासा बिंदू होण्याचा आमच्या 'उन्मेष' या वार्षिकांकाचा प्रयत्न आहे.

व्यक्तीविकास हा समाजाला अभिप्रेम असणारी सामाजिक अभिसरणाची प्रक्रिया होय. श्री व्यक्ती समाजघटक म्हणून समाजाच्या परिवर्तनाची चाहूल ओळखायला लागतो तेव्हा तो त्याच समाजातील माणसापेक्षा वेगळा ठरतो. कारण त्याच माणसाकडून गाज मुक्त अपेक्षा करीत राहतो. त्याआधी त्याला त्याच्या तोलामोलाचा व्हावे लागते तरच तो चिंतनीय होतो. महाविद्यालयातील १२. प्रत्येक धडपडणारा तरूण कुठेतरी आपल्या अस्तित्वाला शोधू पाहतो. स्वतः व्यक्त होवू पाहतो. हे सर्व करतांना तो अडखळतो, पडतो कधी विव्हळतो कधी संपल्याच्या निर्णयापर्यंत पोहचतो अशा तरूणाला आपल्या ठिकाणी असणाऱ्या जोरकस प्रतिभेच्या बळावर जीवनाची वास्तवता हेरण्याची संधी 'उन्मेष' देतो. त्याला समाज जीवनाकडे समर्थपणे पाहण्याची आशावादी दृष्टी देतो. त्याने व्यक्त व्हावं यासाठी त्याला 'उन्मेष' सारखं विचारपीठ मिळावं म्हणून हा महाविद्यालयाचा महत्वाचा उपक्रम.

या सत्रामध्ये जे विद्यार्थी प्रविष्ठ झालेत अशा सर्व विद्यार्थ्यांना (कला– वाणिज्य) आपले वैचारिक ललित, लेख, कविता, चारोळी इ. साहित्यासह आम्ही आमंत्रित केले आहे आणि विशेष म्हणजे आमच्या या हाकेला विद्यार्थ्यांनी प्रतिसादही दिला. त्यांच्या पाऊलखुणा या 'उन्मेष' वार्षिकांकामध्ये पडलेल्या दिसतात. यासाठी आमच्या शेगांव शिक्षण संस्था शेगांवचे संचालक आदरणीय श्रीमान सेठ संजयकुमारजी मुरारका यांच्या प्रेरणा सदैव सोबत असतातच त्यामुळेच एक नवी उर्जा आम्हाला मिळते. आमच्या महाविद्यालयाचे प्राचार्य आदरणीय श्री राम पांडे सर यांच्या मार्गदर्शनाने उत्साह संचारला व कार्य तडीस गेले. तसेच महाविद्यालयातील प्रा. व शिक्षकेत्तर मित्रपरिवार यांनी दिलेल्या योगदानामुळे आपला 'उन्मेष' आकाराला आला.
धन्यवाद !

संपादक मंडळ

# प्राचार्यांचे मनोगत ...

आमचे ग. भि. मुरारका कला वाणिज्य महाविद्यालय, गांव जि. बुलडाणा हे ग्रामीण भागामध्ये वसलेले महाविद्यालय आहे. या गण भागातील मुलांचा ओघ उच्च शिक्षणासाठी सातत्याने आमच्या महाविद्यालयामध्ये येत असतो. सामाजिक बांधिलकीच्या भावनेने आम्ही या सर्व मुलांच्या भविष्याबद्दल सातत्याने जागरूक राहण्याचा प्रयत्न करीत असतो. त्यासाठी आम्ही त्यांच्या अभ्यासक्रमाच्या पूर्णतेबरोबरच त्यांच्या अंगातील सुप्त गुणांना कसा वाव दिल्या जाईल या दृष्टीने वेगवेगळ्या शैक्षणिक, सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन आम्ही महाविद्यालयामध्ये वर्षभर करीत असतो. त्यांच्या यशस्वितेसाठी महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी सातत्याने झटत असतात. त्यातीलच एक महत्वाचा उपक्रम म्हणजे 'उन्मेष' हा महाविद्यालयीन वार्षिकांक होय.

अभ्यासाबरोबरच विद्यार्थ्यांच्या ठिकाणी जाणवणाऱ्या लेखन कलेला लक्षात घेवून यावर्षी त्यांच्याकडून स्वलिखित साहित्य मागितले. ते कथा, कादंबरी, कविता, चारोळी, व्यंगचित्र यांच्या स्वरूपात त्याला विद्यार्थ्यांनी चांगला प्रतिसाद दिला. या सर्वांना 'उन्मेषच्या' माध्यमातून एक आकार देण्यात आला. आमच्या या प्रयत्नांना सतत उर्जा, प्रेरणा देण्याचे कार्य आमच्या संस्थेचे अध्यक्ष श्रीमान सेठ मुरारीलालजी चतरभुजजी मुरारका करीत असतात. तसेच आमच्या संस्थेचे संचालक श्रीमान सेठ संजयकुमारजी मुरारीलालजी मुरारका यांचे मार्गदर्शन आम्हाला नवी दिशा देत असते. यांच्या प्रोत्साहनाने आणि महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी व शिक्षक तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या प्रयत्नाने हा उन्मेषचा अंक आपणासमोर ठेवत असतांना आनंद वाटतो. तरीही काही उणिवा राहिल्यास त्या आमच्या मर्यादा समजाव्यात. या उन्मेषचे वाचक– अभ्यासक स्वागत करतील अशी अपेक्षा व्यक्त करतो. धन्यवाद !

आपला
प्राचार्य
ग. भि. मुरारका कला वाणिज्य
महाविद्यालय, शेगांव

# संपादक मंडळ


प्राचार्य डॉ.अनिलकुमार राठोड

प्रा.डॉ.विनोद नामदेव इंगळे

प्रा.डॉ.व्ही.एम. डेहनकर

प्रा.डॉ.व्ही.के.गायकवाड

प्रा.कु.एन.एस.राजगुरू



# वडील

आपले वडील असे असतात,
ते आपल्या घराचे प्रमुख व्यक्ती असतात.
ते आपल्या घरातील सर्वांना सांभाळून
ठेवत असतात.
आपले वडील असे असतात,
आपण कुठे चुकलो तर ते रागवतात.
पण त्यांच्या रागवण्यात कुठेतरी
प्रेम लपलेले असते.
आपले वडील असे असतात,
आपल्याला चांगल्या सवई लावण्याचा
प्रयत्न करीत असतात.
त्यांच्यामुळे आजी, आजोबा, आत्या,
काका अशी असंख्य नाती जुळतात.
आपले वडील असे असतात,
कामावरून आल्यावर दमलेले असले तरी,
आपल्याला घरात वेळ देत असतात.
त्यांना कशीची काळजी असली तरी
ते आपल्याला माहिती पडू देत नाही.
आपले वडील असे असतात,
स्वतःच्या कुटुंबासाठी झटत असतात
ते सर्वांपेक्षा वेगळे असतात.
आपल्यावर खुप–खुप प्रेम करीत असतात
आपले वडील असे असतात.

**– कु. रेणुका सुरेश गणगणे**
बी. ए. भाग १

# घर

आपलं घर अस असाव,
आपल्या घरात सतत प्रेम असाव.
घरात मोठ्यांचा मान सन्मान असावा
आपलं घर असं असावं.

आपल्या घरात सर्वांनी एकमेकांना समजून
घेतले पाहीजे आणि
सर्वांनी एकमेकांवर प्रेम करावं
आपलं घर असं असाव

आपल्या घरातील छोट्यांचा
उत्साह वाढविण्याचा प्रयत्न करावा
आणि आपल्या घरात वाद विवाद नसावा
आपलं घर असं असाव

आपल्या घरात देवाच्या पुजेचा
सुहास दरवळत राहावा. त्यामुळे
घर प्रसन्न राहील.
आपलं घर असं असावं
सर्वांपेक्षा वेगळं असावं

जे निर्मळ, सुंदर आणि सुशिक्षीत असावं
आपलं घर अस असावं

**– कु. रेणुका सुरेश गणगणे**
बी. ए. भाग १

# आई-वडील

आई–वडील असे असतात
ते आपल्याला जन्म देणारे असतात
आई वडिलांमुळे आपले नाती जुळतात
ते आपल्यावर रागवतात पण
त्यानंतर आपल्या पाठीवर
प्रेमाचा हात फिरवतात

आई–वडील असे असतात
आई वडिलांमुळेच तर आपल्याला
आजी, आजोबा, मामा, मावशी,
आत्या अशी नाती जुळतात

आई वडिलांची सेवा हीच ईश्वरसेवा असते
आई–वडील असे असतात
ते आपल्याला चांगले वळण
लावण्याचा प्रयतन करीत असतात
आपल्याला रागवतात किंवा मारतात
त्यामध्ये सुद्धा प्रेम लपलेले असते
आई–वडील असे असतात
पण ते खुप चांगले असतात.
त्यांचा राग कधिच मनात ठेवू नये
कारण ते आपलं चांगलं व्हावं
यासाठी आपल्यावर रागवतात पण
त्यांच्या मनात प्रेम असते
आपले आई–वडील असे असतात

**– कु. रेणुका सुरेश गणगणे**
बी. ए. भाग १

# चारोळी

माणसाला जिंकायचे असते, 'भावनेने'
रागाला गिळायचे असते, 'प्रेमाने'
अपमानाला जिंकायचे असते, 'आत्मविश्वासाने
अपयशाला जिंकायचे असते, 'धिराने'
संकटांना जिंकायचे असते, 'धैर्याने'
माणसाला जिंकायचे असते, 'माणुसकीने'

## पेनाचे महत्त्व

पेनाविना अक्षर नाही
अक्षरा विना ओळ नाही
ओळी विना साक्षर नाही
साक्षरा विना नोकरी नाही
नोकरी विना सुखी संसार नाही

## ज्ञानाचे महत्त्व

केस वाढवून अजय देवगन
किंवा विद्या बालन होण्यापेक्षा
ज्ञान वाढवून अण्णा हजारे
किंवा किरण बेदी व्हा ।

## इतिहासाचे महत्त्व

इतिहास घडविणारी माणसे
इतिहास विसरू शकत नाहीत
इतिहास विसरणारी माणसे
इतिहास घडवू शकत नाहीत
हा ही एक इतिहास आहे

**– धनंजय पहुरकार**
बी.कॉम. १

# अविस्मरणीय क्षण

कु. पुजा लालचंदानी टावरी, बी.कॉम. भाग ३

प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात अनेक प्रकारचे अविस्मरणीय क्षण येत असतात. त्याच अनुभवातून व्यक्ती आपली पुढची वाटचाल करीत असतो. काही क्षण चांगले तर काही क्षण हे वाईट पण असतात. प्रत्येक व्यक्ती हा चांगल्या क्षणातून काहीना, काही तर शिकत असतो. पण काही वाईट अनुभव पण माणसाला कोठेना कोठे प्रेरीत करीत असतात.

त्यामध्ये विद्यालयीन आणि महाविद्यालयीन जीवनातील क्षण असतात. हे अनुभव असे असतात की, आपण त्यांना विसरण्याचा प्रयत्न सुद्धा केला तरी आपण त्याला विसरू शकत नाही. म्हणूनच म्हणतात ना,

**'विसरायचे असतात ते दिवस,**
**विसरायच्या नसतात, त्या आठवणी'**

ही म्हण खरोखरच आहे. कारण, आपण ते दिवस तरी विसरू पण त्या आठवणी मात्र जपूनच आपल्याकडे राहतात. मला तरी वाटत माझी म्हण कोठेतरी चुकून राहिली. कारण, ती म्हण तशी नसून अशी आहे.

**'गेले ते दिवस, उरल्या त्या आठवणी'**

होय ना ! पण, माणूस माझ्या मते ते दिवस विसरू शकतो पण, त्या आठवणी मात्र कधिच विसरू शकत नाही. मी असे नाही बर म्हणत की, प्रत्येक व्यक्ती दिवस विसरतोच तसे नाही, काही व्यक्ती तर आठवणी सोबतचा माझा एक दिवस आणि तो झाला आता अविस्मरणीय क्षण !

मला पण माझ्या जीवनात अनेक अविस्मरणीय क्षण तसेच अनुभव आले. आणि त्या अनुभवांनी त्या काही क्षणांनी माझ्या मनात एक वेगळीच जागा बनवून ठेवली आणि माझ्या मते तो क्षण मी कधीच विसरू शकणार नाही. आणि तो क्षण विसरण्याचा प्रयत्न सुद्धा करू शकत नाही. तो अविस्मरणीय क्षण आहे 'एन.एस.एस.' कॅम्प मधील.

एनएसएस कॅम्प म्हटले की, अनेक प्रकारचे अनुभव व अनेक प्रकारच्या आठवणी हे आपल्या मनात राहतात. यामध्ये येणारे अनुभव हे काही वेगळ्या प्रकारचे असतात. कारण, या कॅम्पमध्ये आपला संवाद होतो तो ग्रामीण भागातील लोकांशी, त्याच्या जीवनशैलीची आणि त्यांच्या साध्या भोळ्याभाबळ्या स्वभावाशी. कारण, ग्रामीण भागातील लोक ही शिक्षणाने मात्र कमी शिकलेली असतात पण मनाची मात्र फार मोठी असतात.

तर अशाच ग्रामीण भागातील माझा अविस्मरणीय क्षण आहे. तो म्हणजे 'एका लोकांच्या शेतात काम करून म्हणजेच, हातमजूरी करणाऱ्या बापाचा आणि त्याच्या सहा मुलींचा' हा अनुभव, हा क्षण माझ्या मनाला इतका प्रेरित करून गेला की, मी

बापावर काही लिहणार याची कल्पना सुद्धा करू शकत नाही.

'ज्या वेळेस मी त्या बापाशी संवाद साधत होते त्यावेळेस मात्र त्या बापाची कहानी मी ऐकली ती होती एका मुलाच्या अपेक्षेपोटी झाल्या सहा कन्या. प्रत्येक माता–पित्याला आणि घरातील माणसांना वाटत की, आपल्या घराचा कुलदिपक असावा. जो आपण मरण पावल्यावर सुद्धा आपलं नावं चालवू शकेल. आपल्या कुळाच नांव चालवू शकेल. अशी प्रत्येकीची अपेक्षा असते आणि तशीच अपेक्षा या पण बापाची होती आणि त्या अपेक्षेपोटी या बापाला झाल्या त्या सहा मुली, तर बापाला विचार पडला की, सहा मुली, सहा मुलींचे लग्न, त्यांचे शिक्षण. त्या बापाने त्या मुलींना शिक्षणापासून वंचित ठेवण्याचा खूप प्रयत्न केला. पण, त्या मुली मात्र त्या शिक्षणापासून वंचित न राहता त्या स्वतः आपल्या पैशांनी शिकल्या म्हणजेच शेतात काम करून सोबत शिक्षण पण पूर्ण केले आणि बापाने मात्र सर्व आयुष्यभर त्या मुलींचा तिरस्कार केला. पण सरते शेवटी म्हणतात ना.

**'मुलगी ही कोणापेक्षा कमी नाही,**
**आणि यशापासून ती वंचित नाही'**

तर त्या मुलींनी हातमजुरी करून आपले शिक्षण पूर्ण केले आणि आपल्या पाचही बहीनिंना शिकवून पुढे नेले आणि त्यावेळेस त्या बापाला समजले की, आज माझ्या मुली माझं नांव काढत आहेत. आणि शेवटी त्याच बापाने म्हटले की,

**'मुलापेक्षा मुलगी बरी,**
**दोन्ही कुळाचा उद्धार करी'**

कारण त्याच्या मुलींनी त्या बापाचं एवढ नांव केल की, एखादा मुलगाही आपल्या बापाचं एवढं नाव नाही करणार तेवढ त्या मुलींनी केलं आणि आता तिच मुलगी त्या आई–वडिलांना आणि घरातील सर्व सदस्यांना पोसत आहे. त्या जागी एखादा मुलगा असता तर त्याने त्या आई वडिलांना म्हटलं असत की, तुम्ही काय मला शिकवल तर मी तुमचे पालन पोषण करू अस नाही म्हणत की, सर्व मुल 100 टक्के मध्ये 80 ते 90 टक्के मुलं ही अशीच असतात की, ज्या आई वडिलांनी अपल्याला जन्म देवून दुनिया दाखविली त्यांच्याशीच ते गद्दारी करतात. म्हणून मुलापेक्षा मुलगी कधीही चांगली.

या अनुभवातून एकच सांगता येईल की, असले बाप असल्या कारणाने आज मुलींची संख्या कमी झाली आहे आणि त्यामुळेच मुलगी वाचवण्याकरीता अशा बापांशी संघर्ष करण्याकरीता आज आपल्याला 'लेक माझी' या अभियानासारखे अभियान राबवल्या जावू लागले. तरिही काही बाप असे आहेत की, मुलगी झाली तर आपल्या घरात बापाचा जन्म झाला असे समजतात. पण मी एकच म्हणेल म्हातारपणात मुलगा जेवढी साथ देत नाही त्याच्या कितीतरी पटीने मुलगी साथ देते. आणि सरतेशेवटी म्हणते मुलगी मुलापेक्षा कमी नाही तिचा स्विकार करा, तिला फेकून देवू नका.

■ ■ ■

# विद्यार्थ्यांचे आजचे कर्तव्य

कु. साधना प्र. सावदेकर, बी. ए. भाग १

आज जेव्हा केव्हा वृत्तपत्र उघडावे तेव्हा तेव्हा मनाला भिवविणारी व अंतर्बाह्य शहारून सोडणारी कोणती बातमी वाचायला मिळत असेल तर ती म्हणजे विद्यार्थ्यांच्या चळवळीची. आज कुठे तर बंगला, उद्या कुठे उत्तरप्रदेश, काश्मिरमध्येही तीच चळवळ, बिहारही तसाच पेटला, तर दक्षिणेस तीच आग पसरली. आगीच्या भक्ष्यस्थानी पडत आहे सरकारी इमारती, जनसेवेची केंद्र म्हणजे रेल्वे, नभोवाणी. त्यांनाही अग्नीच्या दाढेखाली ढकलल्या जात आहे. मोटारी, स्कूटर्स, बसेस, हॉटेल्स एवढेच नव्हे तर निरपराध लोकांची घरे व दुकानेही पेटविण्यात येत आहेत. ही संपत्ती कोणाची? राष्ट्राचीच ना? राष्ट्र कोणाचे? आपलेच ना, मग पर्यायाने ही हानी कोणाची? राष्ट्राची. म्हणजेच तुमचीच. विद्यार्थी हा राष्ट्राचा आधारस्तंभ, राष्ट्राचा भाग्यकर्ता तोच. परंतु हा आधारस्तंभ कोसळला तर राष्ट्र उभे राहणार कसे ? आपण राहणार कुठे? जगात तोंड दाखविणार कसे ? राष्ट्रपती राधाकृष्णनसारख्या समतोल विचारांच्या नेत्यानेही याबद्दल चिंता व्यक्त करावी, यापेक्षा दुःखाची गोष्ट कोणती ?

विद्यार्थी आजही आहे व यापूर्वीही होता. एवढ्या भारतीय युद्धाचे नेतृत्व करणारा व कर्मयोगाचा मंत्र देणारा श्रीकृष्ण देखील सांदिपनीच्या आश्रमात विद्याभ्यास करणारा विद्यार्थी होता. मर्यादा पुरूषोत्तम श्रीरामचंद्र हाही वशिष्ठांचा विद्यार्थी होता. लो. टिळक, म. गांधी, रविंद्र रविंद्रनाथ विद्यार्थी होते. ते शिक्षक होते तेव्हा त्यांचे विद्यार्थी होते. पण विद्यार्थी व राजकारण असा द्वंद समास कधीच झाला नव्हता. त्यावेळी अशा समस्याच नव्हत्या असे म्हणता येणार नाही. समस्या याहीपेक्षा गंभीर होत्या. पण विद्यार्थ्यांनी राजकरण केले नव्हते. आजची स्थिती ह्याविरूद्ध दिसते. कोणतीही राजकीय चळवळ विद्यार्थ्यांच्या सहकार्याशिवाय पार पडत नाही. कोणत्याही राजकीय प्रश्नांवर निघालेला मोर्चा, निवडणुकीची मिरवणूक विद्यार्थ्यांशिवाय भागत नाही हे असे का?

हे असे का? या प्रश्नाचा विचार करण्याची पाळी आपणांवर आली आहे. विद्यार्थ्यांनीही त्याचा विचार करावयाचा आहे.

इंग्रजी सत्तेविरूद्ध आपला देश पेटला होता. लहानापासून मोठ्यापर्यंत त्याच्याविरूद्ध द्वेष होता. पण तेव्हाही आजच्या इतकी विद्यार्थ्यांत राजकीय जागृती दिसत नव्हती. पण हे लोण आले मात्र तेव्हापणूसनच. आज त्याचा वणवा पसरत आहे.

राजकीय जागृती हे जिवंतपणाचे लक्षण होय. अन्याय सहन करणे हे भ्याडाचे लक्षण होय, हे मान्य. आपल्या अन्यायाची दाद मागण्याचे ठिकाण आपली शाळाआहे, बाजार

नव्हे, एखाद्या मुलाला मारले तर त्याचा निषेध करण्यासाठी, एखाद्या पुढाऱ्याच्या अध्यक्षतेखाली सभा घेवून संबंधीत शिक्षकास माफी मागायला लावणे आदी प्रकार कितपत योग्य होय? इंग्लडच्या युवराजास त्याच्या मुख्याध्यापकाने दारू प्याल्याबद्दल चोप दिला. पण इंग्लडमध्ये चळवळ झाल्याचे ऐकवित नाही. मग ते आमच्यापेक्षा मागासलेले आहेत का? ज्या प्रश्नांशी पालकांचा संबंध आहे त्याबद्दल पालकांनी घरी झोपून आपल्या पाल्यास चळवळीची परवानगी देणे, अंतिम त्यांच्याच नाशास कारणीभूत होईल.

आज या प्रश्नांचा गंभीरपणाने विचार व्हायला हवा. विद्यार्थी हा भारताचा भाग्यविधाता आहे. तो आदर्श नागरिक व्हावयाचा आहे. म्हणून आदर्शत्वाची ओळख याच वयात त्याला व्हायला हवी. हे वय आदर्शाप्रत द्यावावयाचे आहे. हा कुठला अनादर्श आम्ही त्यांच्यापुढे मांडतो आहोत?

पाश्चात्य व पौर्वात्य देश आज सर्वच क्षेत्रात आघाडीवर आहेत असे आपण मानतो. त्यांच्या देशातही कोणी कोणावर अन्याय करितच नसेल असे नाही. कुठे कोण्या नव्या कुलगुरूची निवड होतच नसेल असेही नाही. आपल्याप्रमाणेच त्यांच्यासमोरही अनेक समस्या असतील. परंतु त्यांनी राष्ट्रीय संपत्तीची हानी केल्याची बातमी नाही. इंडोनेशियात विद्यार्थ्यांनी चळवळ केली हे म्हणणे कितपत योग्य आहे? कारण त्यांना राजकीय संस्थांनी राबविले होते.

राजकारणी पुरुषांना हवे असलेले चळवळी विद्यार्थी हे भावनावश असल्यामुळे लवकर भडकतात, हे हेरून त्यांना हा पवित्रा घ्यावा हे सहज आहे. परंतु आपण कोण, आपला धर्म काय, कर्तव्य काय, राष्ट्रासाठी कोणता त्याग करावा याचा अभ्यास नको का करायला? नेता व्हायचे असेल तर त्याने या गोष्टींचा विचार करायलाच हवा. परकीय शत्रू दाराशी उभे असतांना देशात अशांतता निर्माण करण्यात केवढा धोका आहे, हे जाणून घेण्याची आज गरज आहे.

विद्यार्थ्यांनी राजकारणी व्हायचे ठरविले असेल तर ते स्तुत्य आहे. पण त्याने प्रथम हे लक्षात ठेवावे की, तो प्रथम विद्यार्थी आहे. विद्येचा अर्थी– विद्या प्राप्त करणारा. या वयात त्याने ती प्राप्ती करावी राजकारण शिकायचे असेल तर तिही विद्या प्राप्त करावी व पुढे ती वापरात आणावी. त्याने देशाच्या, परदेशाच्या चळवळीच्या इतिहासाचे परिशिलन करावे, अभ्यास करावा, आपली वैचारिक बाजू भक्कम पायांवर आधारावी व मग विद्याभ्यास संपल्यावर खुशाल राजकारणात उडी घ्यावी. अशा अभ्यास विद्यार्थ्यांनी पुढे राजकारण हाती घेतले तर देशाचे भले झाल्याशिवाय राहणार नाही. देश संक्रमणावस्थेत जात आहे. देशात नवनिर्माण कार्य व्यापून हवे. सैनिक, वैज्ञानिक, संशोधक, स्थापत्यशास्त्र विशारद, कृषिपंडीत यांची गरज आहे. प्रथम या गोष्टी पहा ! समस्या असेल तर शांततेने सोडवून घ्या, पण देशाला असे बदनाम करू नका.

''''''''''

# आई

"स्वामी तिन्ही जगाचा
आईविना भिकारी"
मायेची आई हवी
प्रेमाने जवळ घेण्यासाठी
कठोर वागणारी आई हवी
प्रयत्नांना यश मिळविण्यासाठी.
आशीर्वाद देणारी आई हवी
आनंदाचे अश्रू ढाळणारी आई हवी.
माझ्या यशाला साथ देण्यासाठी आणि
कठोर शिकवण देणारी आई हवी.
चुका शोधण्यासाठी नि याच चुका
सुधारण्यासाठी संधी देणारी आई हवी.
पुन्हा जिद्दीने नवे पाऊल टाकण्यासाठी
आत्मविश्वासाने उभे करणारी आई हवी.
आई फक्त तुझ्यासाठी नि
फक्त तुझ्यासाठी

**— कु. राधा विष्णु कलोरे**
बी. ए. भाग १



# जग

या जगात सगळच चांगल असं नसतं
अस नसतं म्हणूनच सगळ जग फसतं
या जगात कुणी कुणाचा विचार करत नाही
कळून चुकले आपल्यासाठी
कुणी दुसरा मरत नाही
आणि जो हे काम करीत असतो
तो धावपळीच्या युगात वेळेला धरत असतो
चांगल्या कार्याला या जगात स्थान नसते
असं नसतं म्हणूनच हे सगळ जग फसत।।
या जगातील नाते पूर्ण मायाजाल आहे
आर्थिक ओलावा असला
की जवळ पूर्ण काळ आहे
आणि तो ओलावा संपला की
पुन्हा अग्नीजाळ आहे
स्वार्थाशिवाय कोणी राहत नसत
अस असत म्हणूनच
हे सगळ जग फसत
या जगात प्रेमाच्या विचाराने
राहावे लागणार
जुन्या म्हणीचा शांतीदुताचा
विचार सांगावा लागणार
दया, क्षमा, शांती हा
मंत्र आत्मसात करावा लागणार
जग हे बंदीशाळा व
त्याचे विद्यार्थी बनावे लागणार
जग आहे बंदीशाळेच व
विद्यार्थ्यांच नात माहीतच नसत
अस नसते म्हणूनच हे
सगळ जग फसत

कु. वर्षा घेंगे
बी. ए. २

# म्हणी

गोगल गाय पोटात पाय
प्रयत्नांति परमेश्वर,
प्रयत्नाने वाळुचे कण रगडित तेलही गळे
वन्ही तो चेतवावा रे ! चेतविताचि चेततो !
असाध्य ते साध्य करिता सायास

सोन्याची तनु जाळीतेस
आपुली पाषण मुर्तिपुढे
मुग्धे ते वद कोण पुण्य
तुझिया हातात तेणे चढे

नर करे सो नर का
नारायण बन जाएगा
बोलाचिच कढी, बोलाचाच भात,
जेवोनिया तृप्त कोण झाला?
ग्रंथ हे गुरू होत

भाग्याकरिता संकल्प करावे,
दृढनिश्चया वाढविता जावो
तैसेचि प्रयत्न करीत रहावे?
आळस सोडोनि, केल्यानेच भाग्य कळते,
केल्यानेच स्वर्गसुख मिळते,
केल्यानेच सर्व काही होते, मानवाचे।

मित्रा म्हणोनि प्रयत्नशिल व्हावे।
प्रारब्धाचे थोरपण न मानावे.
कर्तव्याने चमकून उठावे ।
भुमंडळी उत्साहि

मनोरे मानसी ज्यांच्या ।
ज्यांना लोड आधार
तयांचा एकोनी टाहो ।
द्या देवा न येणार.
घणाचे घाव घालावे । गळावा घाम अंगीचा
यशोदेवी तयासाठी । करीगे हार फुलांचा

गाव हा विश्वाचा नकाशा ।
गावावरून देशाची परीक्षा
गावाची भंगता अवदशा
येईल देशा।

शहरी यंत्रदिवे आली ।
गावाची उद्योग कला मेली।
कुशल माणसे शहरी गेली ।
उद्योगांसाठी शहरी गेली
गावची बुद्धी शहरी गेली
गावची समृद्धी कष्टाळू शकती
हस्तकला सिद्ध तिही गेली ।

जाळावाचून नाही कड।
मायेवाचून नाडी रड

वैरी न चिंती ते मन चिंती

एका हांडीत शिजला नाही
म्हणून दुसऱ्या हांडीत कसा शिजेल?

आयुष्य उजळत ठेवावं लागतं
कधी परिस्थितीच्या धगीनं
तर कधी महत्वाकांक्षेच्या इंधनान।

फुल उमलंत जबरदस्तीत उमलत नसतं
ज्या रोपाला फुल उगवणार असतं
त्या रोपान स्वतःहून ठरवलेलं असतं।

राजा मेला तर राज बुडत नसत अन्
नवरा मेला तर घर पडत नसतं

येरे उंबरा अन तोंडात पड.

कु.राधा विष्णू कलोरे
बी.ए.भाग 1

# जीवन कसे जगायला पाहीजे

आजच्या पोराची हिप्पी शौकाने
मान मुरडत चालते झटक्यान
पोराचा तो तिवरट स्वभाव नसला पाहीजे.
शाळा शिकून आंबेडकर झाला पाहीजे
असं इज्जतदार जीवन जगायला पाहीजे.
फुलपँन्ड आणि मनीला पोरी झुरतात
पोराच्या लेण्याला पोरीचा तो
तिवरट स्वभाव नसला पाहीजे.

शाळा शिकून इंदिरा गांधी झाली पाहीजे
असं इज्जतदार जीवन जगायला पाहीजे.
असं इज्जतदार जीवन जगायला पाहीजे
आई बाप म्हणते आपल्या मुलाला
रोज जा बाळा रोज शाळेला.

आई बापाच्या समोर हो हो म्हणतो
शाळेच्या मागे जाऊन हा शिट्ट्या वाजवितो.
पोराचा तो तिवरट स्वभाव नसला पाहीजे.
शाळा शिकुनी आंबेडकर झाला पाहीजे.
असं इज्जतदार जीवन जगायला पाहीजे
वानात नसून पण गुणात पाहीजे
चार चौघांमध्ये एकिराण पाहीजे
स्वतःच स्वतः त्याला कळले पाहीजे
असं इज्जतदार जीवन जगायला पाहीजे

**—मंगेश सुदामा बाभुळकर**
बी. कॉम भाग १

# मैत्री

जिथे बोलण्यासाठी शब्दांची गरज नसते
आनंद दाखवायला हास्याची गरज नसते म
दुःख दाखवायला अश्रूंची गरज नसते
न बोलताच सार काही समजत
ती म्हणजेच मैत्री असते.

**माधव अ. जोशी**
बी.कॉम. भाग १

# शायरी

चाहे कितने भी दूर रहे
पर दोस्ती के सिसिले कभी ना कम होंगे
जब भी लगे तुम तनहा हो,
पलट के देखना
तुम्हारे साये की जगह हम होंगे।

तेरे ख्याल से दामन बचाके देखा है।
दिल को बहुत आझमा के देखा है।
अजीब लगता है
हर दिन तेरी याद के बिगर
हमने कुछ दिन तुम्हे भुला के देखा.

तन्हाई ना पाये कोई साथ
के बाद जुदाई ना पाये
कोई मुलाकात के बाद
ना पढे किसीको आदत इतनी के
हर सांस भी आये तो
उसकी याद के बाद

**कु. शारदा श्रीराम पारेकर,** बी. ए. २

# आई

आई उन्हाची सावली
आई सुखा सागर
निळ्या आकाशाएवढा
तिचा मायेचा पदर.

आई कुणाचीही असो
तिचा सम्मान करावा
तिने टाकलेला शब्द
फुलासारखा झेलावा

माऊलीच्या मायेमुळे
होतो माझा जीव तान्हा
आठवणींना फुटतो
मग अमृताचा पान्हा...

# ध्येय

ध्येय तुझे निश्चित ठेव
नशीबावर विश्वास ठेवू नको.
झेप घे आकाशी
मागे वळून पाहू नको

विज्ञानाच्या या युगामध्ये
हिम्मत तू हारू नको.
वेळ अजून गेली नाही
बेसावध तू राहू नको



यश आहे तुझ्या हाती
मागे तू फिरू नको.
चुका जीवनातील मोजण्यासाठी
निर्णय एकतर्फी घेवू नकोस
योग्यच मिळेल उत्तर तुला
ध्येय मात्र सोडू नकोस
जीवनाचा घे अर्थ ध्यानी
स्वार्थ मात्र पाहू नकोस

सदा सत्याची साथ धर
गाणी खोट्याची गाऊ नकोस
आहे त्यात मान समाधान
लोभाला बळी पडू नकोस

कर यादी तू कमावण्याची
गमवल्यास तू रडू नकोस
दोन्ही बाजूने कर विचार
मेरी मुर्गी करू नकोस

जीवन ध्येय मिळेल तूला
मागे मात्र सरू नकोस

— कु. लक्ष्मी खेन्ते, बी. कॉम. १

# मागणी

भुषण शरदराव खुमकर, बी. कॉम. २



शेगांवीचा राणा श्री संत गजानन महाराज. विदर्भाची पंढरी असलेली संत नगरी या मधील मी एक रहिवसी. माझ्या बालपणापासून ते आतापर्यंत श्री संत गजानन महाराजांचे एक चमत्कारिक रूप मला आढळून आले. आजच्या युवकाला जर जीवनात खरोखरच यशस्वी व्हायचे असेल तर त्याला आपल्या अभ्यासाच्या जोडीबरोबरच एक भक्तीची आस असायला पाहीजे. पूर्वीपासून साधू संतापासून ते महाराजापर्यंत आपल्याला असे आढळून येते की याला एका भक्तीची ओढ होती आणि खरोखरच शिक्षणाबरोबर भक्तीची सुद्धा जोड असायला पाहीजे. कित्येक साधू संतांनी भक्तीचा साधा आणि सरळ मार्ग सांगितला आहे.

**उगीच का बरळता ऐसे ।**
**बघितल्याविन संताशी ।**
**कळे कोणास वैभव ते ।**
**ओतल्या जरीही धनराशी ।**
**निरंजन भाव । चैतन्याचा गाव।।**
**योगीयाचा राव । गजानन ।**

मित्रांनो आज काल आपण समाजामध्ये पाहतो आहे. भक्तीमार्ग हा एक पैसा कमविण्याच्या साधनाप्रमाणे त्याकडे लोक पाहत आहेत. पण असे न करता आपण मनोभावे भक्तीमार्गाचा अंगीकार केला पाहीजे. जर भक्ती मार्गाचा आपण विचार कला तर शेगांव येथील गजानन महाराजांचे मंदिर आपल्या निस्वार्थीपणाने भक्ती मार्गाचा संदेश देतांना आढळून येते. आज जर गजानन महाराज संस्थानचा विचार केला तर तिथे लाखो भाविक दर्शनासाठी येतात आणि या लाखो भाविकांची चप्पल ठेवण्यापासून ते जेवणाच्या आणि झोपण्याच्या व्यवस्थेपर्यंत त्यांची काळजी घेणे हे कोण्या एका व्यक्तीचे काम नाही आहे यामागे नक्कीच एका दैवी शक्तीचा हात आहे आणि असायलाच पाहीजे. नाहीतर हे अशक्य आहे असे वाटते.

साधु संतांच्या होताची धारा ।
लागे चिंत एकरूपी । तुज करीता वंदन ।
देव देवता प्रसन्न । ऐसा थोर गजानन ।
तू शेगाव निवास।

भूषण अलंकार ।
न सौंदर्य साकार ।
विदेही आकार । ईश्वरूप।

म्हणून म्हणतो जिवनात फक्त एकच मागा आणि एकाच वेळेस मागा की, ज्यामुळे आपले भले होईल. पण भीक मागु नका कारण भीक ही रोजच मागीतली जाते. आज आपल्याला असे आढळूनयेते की, परीक्षा जवळ आली की विद्यार्थी देवाला भीक मागतात 'मला पास होवू दे तर मी पेढे वाटेल, एक तुला ठेवेल आणि बाकी सर्व मी खाईल' तसेच आपल्याला असे आढळून येते की, माणूस जेव्हा संकटात असतो तेव्हाच तो देवाकडे भीक मागतो, असे न करता जर आपण सुरूवातीपासून आपल्या दैनंदिन कर्तव्यापासून ते कामापर्यंत देवाचा ध्यास करून त्यांना स्मरणात ठेवून जर कार्य केले तर कितीही कठीण कार्याला आपण मार्गी लागू शकतो.

ओळख तो आवाज ओळख ती खुण
आपल्या भक्तांसाठी तो फिरतो आहे अजून
त्याला उगम नव्हता त्याला अंत नाही
तो त्रैलोक्याचा स्वामी नुसताच संत नाही ।
त्याच स्मरण कर देहभान विसरून
तो हळुवार येईल अन् कानात सांगून
।।गण गण गणात बोते।।
।।जय गजानन।।
काही नाही माझे मागणे तुजला।
ठेवी चरणाला जन्मोजन्मी।
शेगांवचा राणा श्री संत गजानन महाराज
यांना माझा शतशः प्रमाण
अनंत कोटी ब्रम्हांड नायक
महाराजाधिराज योगीराज परब्रम्ह
सच्चिदानंद भक्त प्रतिपालक शेगांव निवासी
समर्थ सद्‌गुरू
।।श्री गजानन महाराज की जय।।

# बोल मित्रा

कोरड्या झाल्या विहिरी
तहान गेली खोल, मित्रा
माणसे झाली कवडीमोल
धातुस आले मोल मित्रा
वाटले गेले गहु तांदुळही
येथे काल त्या घरातले
आठवड्यापूर्वीच वाजले
जेथे लग्नाचे ढोल मित्रा


गाय वाटली, बैल वाटला
मायबापही त्यांनी वाटले
दुधाचा रंग बदलला
ममता झाली अबोल मित्रा
शिपडून रक्त हृदयातल
पिळवली ज्याने संसारशेती
सांग सावरावा कसा तोल मित्रा?

आठवण का तुलाही
तुझा वाडा खेड्यातला
पापणीतील थेंब पुसून
माझ्याशी बोल तू मित्रा
नवी नाही गोष्ट तशी
जुनीच तुला सांगतो
वाटणीच्य रेषांनीच बदलला
भारताचा भूगोल मित्र

**भूषण शरदराव खुमकर**
बी.कॉम.2

# गोरा

**धिरज सुरेश शेगोकार, बी. ए. २**



बाया माणसं म्हणतात,
सुरेशभाऊच गोरं मारकं ।
इकाना राज्या नाईतं
करीन तुम्हा आम्हाले सरकं ।।
त्या गोऱ्याले एकच खोड भारी ।
माणसांना सोडून बायांना मारी ।
असं वाटलं मारत नाई;
काढला बुढ्यावर ताव,
डोयाले लागला शिंगाचा निसटता घाव।।
अस करून गोरा बाजारा आणला ।
पण तो कसाबाच्या नजरेशिवाय
कोणाले नाही भिनला।।
त्याचे शिंग होते टोकदार
वाकडे तिकडे पाय।
अन् भर बाजारात जो तो
आमच्या चिकण्या करून जाय।।
इकून तिकून गिऱ्हाईक आलं,
बुढा म्हणते ७ शिवाय नाई सोडत।
मी राहीलो बाजुले बुढा राहीला बाजुले
सदाशिवलेच मालक मालक करत ।
बुढा दुरूनच सांगतो,
सदा गड्या पाचच्या कमी नाही पुरत।।
कसाई राज्या कोणी
नाथ धरते तं कोणी मोरकं।
केल त्याईनं गोरं सरकं।।
साऱ्या कसाबाचे त्याच्या मानीवर हात।
गोरं मान खाली करून बसलं दात खात।।

अस बोलता बोलता सौदा झाला।
माणूस माणुसकीच्या दूर गेला।।
अन् त्याचा दोर कसाबाच्या हातात दिला।
म्हणून अस वाटते की ना
घ्याव म्हैस ना घ्याव गायक
अरे ऐईच्या पैदासले गिऱ्हाईक
त फक्त कसाबचं हाय।।
मले त्या सौद्यात ना
बोला वाटे ना काही करा वाटे
माय हृदय आले भरून ।
मग बसलो तोंड उलचक करून
व पायात दुरून ।।
आमचं एकएक पाऊल बाजाराच्या बाहेर पडते
त्या गोऱ्याची केविलवाणी
नजर आम्हावर पडते ।
मी मागे पाहून पुढे चालत होतो ।
त्याच्या आठवणी मनात घेत होतो।।
आमाले पाहून त्याचं मन येत होतं भरून।
की चालले रे हे आता आपल्याले सोडून।।
मी पाणी नाही पिलो
पाण्याचा घोट नाही गिळला।
माझ जनावर कसाबाच्या हातात दिल्यावर।।
'कसाब' या नाचा अर्थ कळला।।



# प्रार्थना

विद्यालय हे मंदिर सुंदर
प्रयाग जणू हे प्रज्ञेचे
ज्ञान दिवाळी शोभा उजळी
प्रसन्न गृह हे विद्येचे ।।१।।

इथे आरती ज्ञान भारती
उन्मेषाची अद्र फुले
अरप्रित सजले विद्यामंदिर
मांगल्याची जोत जळे ।।२।।

या वेलीवर यज्ञ तमाचा
अहमपणाचा होम करू
स्फूर्ती दिपतीला प्रेरक ऐसे
कृतीने विद्यालय सजवू ।।३।।
विद्यालय हे मंदिर सुंदर

**कु. पुजा गजानन नायसे**
बी. ए. २

# स्वप्न

म्हणे स्वप्नात सार चालून जातं
कळत नकळत घडवून जात
हृदयाची धडधड वाढू लागते
गाल गुलाबी होवून जातात
आणि ओठही बोलायला आतूर होई
त्याला भेटण्याची ओढ लागे
पोचू पावती नजरेद्वारे कळत
दोघामधील दरी एका भेटीमुळे सरते
दोघांचाही होकार येताच
मन कसे खुलून जाते
जसे पावसाचे सन फुलून येते
अरे हे तर सारे स्वप्नच होते.
काही मूले स्वप्नात आयुष्य
बघतात ते पुढील प्रमाणे
सुंदर मुलगी कॉलेजमध्ये दिसली की,
कॉलेज कसं विधानसभेसारखं वाटत
आणि ती मुलाकड पाहून हसली की
त्याला बिनविरोध 'आमदार'
झाल्यासारखं वाटतं
एकदा का ती लग्नाला हो म्हणाली की,
मुख्यमंत्री झाल्यासारख्य वाटत आणि
लग्नाला एक वर्ष झाला की मग
आदर्श घोटाळा केल्यासारखं वाटत
म्हणून म्हणतो मित्रांना तुम्हाला
माझा हा एकच सल्ला आहे
मुलीच्या हसण्यावर आणि
कुत्र्याच्या शांत बसण्यावर
कधीही विश्वास ठेवू नका.

—**शाम प्रभाकर शेगांवकर,** बी. ए. ३

# बेटी

बेटी बनकर आई हुँ
माँ–बाप के जीवन में
बसेरा होगा कल मेरा
किसी और के आँगन में
क्यों ये रीत भगवान ने
बनाई होगी कहते है,
आज नही तो कल तू पराई होगी
देके जनमभर पाल पोसकर
जिसने हमे बडा किया और
वक्त आया तो उन्ही हाथो ने
हमे बिदा किया
टूटके बिखर जाती है
हमारी जिंदगी
पर फिर भी उस बंधन में
प्यार मिले जरूरी तो नही...
क्यों रिश्ता हमारा
इतना अजिब होता है
क्या बस यही हम
बेटीयों का नसीब होता है

# आई

आई म्हणजे मंदिराचा उंच कळस
अंगणातील पवित्र तुळस
भजनात गुणगुणावी अशी संतवाणी
वाळवंटात जावं असं थंड पाणी

आई म्हणजे आरतीत वाजवावी
अशी लयबद्ध टाळी
आणि आई म्हणजे वेदनेनंतरची
पहीली आरोळी

आकाशाचा केला कागद
समृद्धीची केली शाई तरीही
आई–वडिलांची महिमा
लिहिली जाणार नाही

ठेस लागते माझ्या पाई
वेदना होते तिच्या हृदयी
३३ कोटी देवांमध्ये
सर्वात श्रेष्ठ माझी 'आई'

# माँ–बाप

तमन्ना सितारो की
ना आरजु है धरती की
आप जैसे माँ – बाप मिले तो
क्या जरूरत है हजारो की ।

# नशीब

जी माणसं हवीशी वाटतात
ती कधीच भेटत नाही।।
जी माणसं नकोशी वाटतात
त्यांचा सहवास संपत नाही।।
ज्यांच्याकडे जावेसे वाटते
त्यांच्याकडे जायला जमत नाही ।।
ज्याच्याकडे जावू नये असे वाटते
त्यांच्याकडे जावेच लागते
जिवन नकोसे वाटते तेव्हा
काळच संपत नाही।।

**कु. पुजा अशोकराव खलेलकर**
बी.कॉम.1

## जिलो आज


क्यों याद आता है वो पल
जो लौटके नही आएगा ।
इतना मालूम ना था के
वक्त इस कदर रूलाएगा।
जि भरके जिलो आज
क्योंकी ये आज फिर
कल बन जाएगा।

## मैत्री म्हणजे

पहिली ओळख एका अनोळखीची
मग बनते सोबत हक्काची
एक साथ मिळते आपुलकीची
आणि जाणीव होते अतुट विश्वासाची
जी साथ देते कायमची

## मैत्री

आकाशापेक्षाही विशाल
सागरपेक्षाही खोल
चंदनापेक्षाही शितल
गुलाबापेक्षाही कोमल
क्षितिजाच्याही दूरवर
स्वप्नांहूनही सुंदर
प्रेमापेक्षाही प्रेमळ
गंगेपेक्षाही निर्मळ
सत्याहूनही शाश्वत
मंदिराहूनही पवित्र
जसं पावसाच्या थेंबाने
कमळाच्या पानावर लक



मं

## जीवनाचे सार

जीवनपुष्प गुलाब सांगतो
येता–जाता रडायचं नसत
काट्यातसुद्धा हसायचं असतं
रातराणी म्हणते,
अंधाराला घाबरायच नसतं
काळोखातही फुलायच असत
सदाफुली सांगते,
रूसून बसून रहायचं नसतं
हसून खेळून जगायचं असतं.

एक अच्छा दोस्त फुल की तरह होता है
जिसे हम तोड भी नही सकते
और छोड़ भी नही सकते
अगर तोड दिया तो सुक जाएगा
छोड दिया तो कोई और ले जाएगा।

**कु. पुजा अशोकराव खलेलकर**
बी.कॉम.1



# मैत्री

काही नाती बांधलेली असतात
ती सगळीच खरी नसतात
बांधलेली नाती जपावी लागतात
काही मात्र आपोआपच जपली जातात

कदाचित यालाच मैत्री म्हणतात
मैत्री म्हणजे जिव्हाळ्याचे नाते
एक दुसऱ्याच्या भावना
ज्या नात्यात जपल्या जातात

ते नात म्हणजे मैत्री असते
जी मैत्री गरजेपुरती असते, ती तुटते
ज्या मैत्रीत कुठलाच स्वार्थ नसेल
तरच ती मैत्री टिकते

जिथे बोलण्यासाठी शब्दांची गरज नसते
आनंद दाखवायला हास्याची गरज नसते
दुःख दाखवायला आसवांची गरज नसते
न बोलता ज्यामध्ये सार समजते
ती म्हणजे मैत्री असते.

**–कु.चैताली गजानन महाजन**
बी. ए. ३

# माय

पडल्या पावसात माय
तू चारायची गुरं
कंडल थि
पावसाले वाटे अपरूप
गहीवरे ते शिवारं
काखेमध्ये मी
पाठी कापसाची ओटी
माये तू कापूस वेचतेस
आम्हासाठी उपाशीपोटी
असं निंदण खुरपण
तुझी पात सदा पुढं शिका
पाणी चालं झुळं–झुळं
दारात उभी होवून फावडं
गाय आनंदाची,
माय तू काढायची धार
कधी टाकतेस बरास
कधी खोदतेस चारं
काळ्या आईची गं माय,
तुही नित्याचीच सेवा
आता उठ हातपाय,
नाही मिळाला गं मेवा
गळकचं छत सरं,
ओल होई घर
धूप धूप करी चूल
तरी माय टाकते भाकर

**पवन ग. फुटवाईक**
बी. कॉम २

# मिठीत तुझ्या

प्रत्येक आनंद मिळाला होता,
मिठीत तुझ्या
प्रत्येक दुःखही विसरलो होतो
मिठीत तुझ्या


नको होता हिशोब
प्रत्येक क्षणाक्षणाचा
पण, प्रत्येक क्षण
घालवायचा होता
मिठीत तुझ्या

तुझ्या प्रत्येक शब्दानं झिडकारखं
अस्तित्व माझं
तरीही मन माझे विसावले
मिठीत तुझ्या

तू होवून पारधी नेहमीच
खेळावा डाव
हतबल मी पारध सामावून जावं
मिठीत तुझ्या

आव आपलेपणाचा की
भाव परकेपणाचा न कळले
पण जीव माझा गुदमरला आता
मिठीत तुझ्या

**पवन ग. फुटवाईक**
बी. कॉम २



# जगाचा पोशिंदा

धीर धर बळीराजा
नको होऊ हताश
चिज होईल कष्टाचं
पडेल अन्न घशात
बैलासोबत माया तुझी
काळी आई माती
राबतो रात्रदिन शेतात
पोटात न्याहारी नाई
अनवानी अन अर्धवस्ती
साज चढवतो तू धरणीला
निसर्गाचा लहरीपणा तव
धुळीत मिळवतो करणीला
व्यापाऱ्याची साठेबाजी अन्
सावकारी कर्जाचा बोजाचा
महिना श्रावण असो की, रमजान
तुला नेहमीच घडतो रोजा
खचू नकोस लढत राहा
तुझही नशीब
फडफडेल नशीब औंदा
मुलं पत्नीचा विचार करावा
तुच खरा जगाचा पोशिंदा
तुला माझे शतशः प्रमाण

—**पवन ग. फुटवाईक,** बी. कॉम २

# देशी नाई भेटली तर गावरानचं पितो

रोज तुले पायत जाव,
तवा तुला काईच नाई वाटलं
आता कस तुया मनात
मायाबद्दल अचानक प्रेम दाटलं

म्या तुयाइकळे पायलं की
तू तोंड कोळे करतं
माया मनात वाटे लेका
मंत्री पोरगी सज्जन हाय खरचं

मी साखऱ्याहूनगोड बोलो
तरी तुले मीरचीच लागे
आता झाले काय तुये
चिपळाचे डोय जागे

कॉलेजला जाता जाता लय नखरे
करत जास म्या इच्यारलं एक डाव
त म्हणाली माला मीत्र आहे तो खास
माया देखत बोलायची तुला
उलशीकही नोती लाज

त्यान दुसरीले म्हणल म्हणून
म्हणतं मले आज, तुले म्हणलं होतं म्या
तो पोरगा चांगला नाई
तवा तु म्हंतस की तुले
तकलीफ हाय काई
तुमी बोलत जा तवा
माया मनान आग लागत जाय
आता कशी आली कुठ्यावर
बिना पायखुटीचे देवगाय
त्यान खाल्ली तुया दुधावरची साय

आता मले पाणी टाकून
दुध खावु घालतं काय
सुटीच्या दिवस तो तुले भेटत जाय
आता कावून भेटत नाही,
मुळले का त्याचे पाय

आता तुया अदाचा आपल्या मनावर
काईच फरक नाही पडत
तू अन् तुझा बंद रूप चुलीत जावुदे
जळतं आता त आपुन पोरीच्या जातीले
खरच भेतो देशी नाई
भेटली तर गावरान पितो

—**पवन ग. फुटवाईक,** बी. कॉम २

# पण...

दिवसही तोच... वाटही तीच...
वेळही तीच... पण ?

रात्रही तीच.... गारवाही तोच
चान्द्रमाही तोच ..... पण?

आसही तीच कास तीच
ध्यासही तोच .... पण ?

प्रितही तीच गीतही तेच
स्वरही तेच... पण ?

देऊळही तेच देवही तोच
भक्तीही तीच... पण ?

भावही तोच गावही तोच
अन् नावही तेच
पण? पण? पण?

**कु. शारदा श्रीराम पारेकर,** बी. ए. २

# दवबिंदूवर

मी इथं .... तू तिथ
तू तिथ जदगी
सांग तुझ्यापासून मी... कसं जगू इथं
तुझ्याविना मन माझं... सुने सुने झालं
आठवणींनी गुलाबपुष्प मग...
हृदयात मावेनासे झाले
जेव्हा सुगंध तुझ्या आठवणींचा
माझ्या मनात दरवळत असतो...
तेव्हा माझ्या मनाचा थांग
मलाच गवसत नसतो...
स्वप्नांच्या झुल्यावर मन माझं झुलतं...
तुझ्या त्या आठवणीत मन माझं रमतं...
खरचं मी इथं... तू तिथं...
सांग तुझ्या वापासून मी कसं जगू इथं...?

**परमेश्वर शेजोळे**
बी. ए. २

# चारोळी

सुफ सुफ सुपारीचं पानं
बिनं काथ चुण्यानं रंगते
माझ्याईकडे पाहू नको
मले इंलू इलूं होते

**पंकज नरोडे**
बी. ए. २

# थांबणारे संपणार

थांबणारे संपणारे
जीवनाचे गीत तू
अन् सुखाच्या सावलीची
रंगणारी प्रीत तू ।

कालचा अंधार गेला,
ही उषेची पावती
अंतरी माझ्या मनाच्या
साठलेली जीत तू।।

एक तो अंधार होता
स्पष्ट माझ्या जीवणी
संपला नाही आताशा
संपलेली रित तू ।।

कोणत्या जखमा दिसाव्या
सावलीच्या अंतरी
दुःख देणाऱ्या जगाचे
झालेस का हित तू ।

जीवना तू नका,
नको तुझी ती वेदना
छळते मला तू कालही
छळतो इथे नीत तू।।

**परमेश्वर शेजोळे**
बी.ए. २

# कवी

आम्हीच होतो वेडे
लागलो कवितेच्या नांदी
जीव जाळणाऱ्या जणू
घेतले वीजेस हाती...

सत्ता संपत्तीच्या मागे
कधी धावलोच नाही
या व्यवहारी जगाला
आम्ही भावलोच नाही...

आमच्या दुनियेचे आम्ही
राजे मस्त कलंदर
आणि हृदयात सदैव
ध्यास धरतो सुंदर...

राहिलो असेच भणंग
राहिलो असेच कफल्लक
आम्हा घरी तेवढे
धन शब्दांचेच शिल्लक ... शिल्लक...

— **भुषण लंके**
बी. ए. २

# शायरी

जरा सी बात देर तक रूलाती रही
खुशी में भी आँखे आँसु बहाती रही।
कोई मिल के खो गया,
तो कोई खो के मिल गया।
जिंदगी हमको बस ऐसे आजमाती रही ।
दुरीयो से फरक नही पडता है।
बात तो दिलो की
नजदियोंकी से होती है।
दिल के रिश्ते तो किस्मत से बनते है ।
वरणा मुलाकात तो जाने
कितनो से होती है ।

— **राजेश बेलुरकर,**
बी.ए. २

# प्रतिबिंब

सुंदर तिच्या चेहऱ्यावर
एक चंद्रबिंब छान होते
बघतांना आरशात तिला
तीच प्रतिबिंब छान होते
वाटत होती मलाही
बघाव एकटक तिच्याकडं
निखरतांना सौंदर्य तिच
चेहऱ्यावर तिच्या हास्य होतं
नाजुकता रेखीवता
जणू रंभेची ती मूर्ती होती
बसली जेव्हा जवळ माझ्या
गालात खुदकन हसत होती
हसतांना चेहरा तिचा
किती गोड वाटत होता
विशा
जणू पौर्णिमेच्या रात्रीचा
मोहक चंद्र भासत होता...
भासत होता.....
भासत होता...

—**ऋषिकेश मसने**
बी. ए. २

# कमावलं की गमावलं

कमावलं की गमावलं?
जिंदगीत केल काय?
अरे आला तसा जाशील
संग नेशील तरी काय?

आज्या पज्यांची इस्टेट
तुनं इकलं वावरं
म्होरच्या पिढीचा तोंडचा
घास इकली भाकर

सोन्याच धुपूट निघे घरी,
त्याचा कंजेल वास हाय
अरे आला तसा जाशील
संग नेशील तरी काय?

मांग्याले आला दारी
त्याले तू खेकसून बोलतं
कुत्र्याले करतं लुलू
वर्तन रठ्ठा मारतं

काशी पंढरीची केली
तू त कोराचा कोरा हाय तू
अरे आला तसा जाशील,
संग नेशील तरी काय?

चोखट बोलला नाही कधी
मतलबी तुवं गाणं
कधी केला नाही करीना
टाकाले नाहीत दोन पानं

सार सळसळत हाय पेवात
पेव बुळाचा वास सुटत हाय
अरे आला तसा जाशील
संग नेशील तरी काय?

स्वर्गात नेऊ की नरकात
यमदूत म्हणे याले
दोन पैसे फायदा जरी
तठीसा घेऊन चाला मले

धनाचा धनगर जरी लेका
सारा ओफय पसारा हाय
अरे आला तसा जाशील
संग नेशील तरी काय?

— **कु. पुजा ढगे,** बी.ए.1

# मैत्रीण

खरचं एक तरी मैत्रीण असावी
फुलाप्रमाणे फुलणारी,
पाखराप्रमाणे उडणारी
सुगंधाप्रमाणे दरवळणारी
अशी मैत्रीण असावी
बंध मनीचे जपणारी
दुःख ह्रदयात खोलणारी
अशी एक मैत्रिण असावी
भोळ्या — भांबड्या मनाची
बनली जरी कोण्या राजाची
मला कधी न विसरणारी
अशी एक मैत्रिण असावी.

— **सिद्धार्थ राहणे,**
बी. ए. २

# चकवे

घडलेल्या घटनांचे,
नसावे काहीच ओझे
आपल्या वर्तमानाचे
आपणच व्हावे राजे


निसटणाऱ्या सुखाचे
कौतुक नसावे फार
सोबतीस असलेल्या
दुःखाचे मानू आभार

रस्त्याने जा कोणत्याही,
जीवन येई आडवे
चकीत करती मना,
चकवे हरेक नवे

चुकवून चकव्यांना,
जो जाई पुढे पुढेच
त्याच्यापासून यश
का राहील दूर थोडेच?

येन केन प्रकारानं
प्रसिद्धी कशास हवी?
प्रसिद्धीपेक्षा किर्तीची,
आहेच खरी थोरवी।

**–परमेश्वर शेजोळे (महाराज)**
बी. ए. २



# जीवन

एखाद्याला रडवण्यापेक्षा
हसवणं फार बरं असते
एखाद्याला दुखावण्यापेक्षा
आनंदी करणं फार बरं असते

एखादी इच्छा पूर्ण झाली नाही
म्हणजे जीवन संपत नसते
जेथे वाटा संपतात तेथूनच
वाटांची सुरूवात ही होत असते

होऊ जीवनात विजयी
ही आशा बाळगावीच लागते
जेव्हा कोणीच येत नसते
आधार होवून तेव्हा आपणच आपलं

जीवन सावरायच असते
जीवनाच्या या खेळात
'सुख – दुःख' ही 'ऊन–सावली'
सारखी येतच असतात

ऊनानंतर सावली ही
प्रत्येकाला मिळतच असते
जीवनातील दुःखांना पाहून
खचायचं नसते

दुःखावर मात करून
सुख मिळवायचच असते
आणि दुःखाला सामोर गेल्याशिवाय
सुखाचे मोल कळत नसते

**–शिवशंकर शेजोळे**
बी. ए. १

# तुझा मार्ग ओळख

कॉलेजच्या जीवनात गायले गाणी
खऱ्या जीवनात वाहीले पाणी
शिक्षणासाठी घरापासून दूर गेला
गावामध्ये होता तसाच राहीला

तू आला रे बाळा शिक्षण घेण्यासाठी
सिनेमा तू नाही आला येथे पाहण्यासाठी
ह्या वयात तुझा फक्त एकच ध्यास
कर तू रात्रंदिवस फक्त अभ्यास

आई वडिलांचे स्वप्न तू खाक केले
त्यांना फक्त खोटंखोटं बोलले
आशा रे त्यांच्या उंचावू नको
त्यांच्या भावना तू दुखवू नको

स्वतः कर असं काही की,
आई–वडिलांना तुझ्यावर अभिमान होई,
उंचावनी छाती जवा समाजात जाई
माझा पोरगा साहेब झाला मन आनंदी होई

काही केल्याशिवाय
जयजयकार होत नाही
प्रयत्न करणाऱ्यांची
कधी हार होत नाही

**–संजय हसनराव चव्हाण**
बी. कॉम. १

# कधी तरी बोलशील

खुप दिवसांनी पहिल्या भेटीला
किती नाकारशील?

कधी तरी बोलशील...!
एवेढे वर्ष लोटले माझे प्रेम डोळ्यातले
केव्हा तरी ओळखशील?
कधी तरी बोलशील...!

तुझी आठवण माझ्या जवळ
प्रेम फक्त तुझ्यावर
नजर केव्हा तरी देशील?
कधी तरी बोलशील...!

अनेक दिवस वाट पाहिली
तुझे मत ऐकण्यासाठी
माझे प्रेम पाहण्यासाठी
कधी तरी बोलशील...!

वाट पाहीन जीवनभर
बेचेन मी क्षण
जीवन जगेल तुझ्यासाठी
कधी तरी बोलशील...!

**–राजेश बेलुरकर**
बी.ए.2

# न्हाय गं आई नग तोडू माव शिक्षण

न्हाय गं आई नगं तोडू व मावं शिक्षण
अगं गुलामगिरीपासून करणार हाय म्या
आपल्या समाजाचं रक्षण.
राजकारणी इतिहास हाय बघ, लय भारी
घडवतात जातीमंदी दंगली, अन मारामारी
ह्या काळ्या मनाच्या पांढऱ्या बगळ्यांवर
चालविणार म्या तलवारी.
डॉ. आंबेडकरांच्या विचारांचं
करणार हाय म्या रक्षण
न्हाय गं आई नगं
तोडू व मावं शिक्षण ।।१।।

थोडशाबी खर्चात,
न्हाय पाडणार म्या तुला
शेतात कामाला जाऊन,
पुस्तकं आणणार म्या मला
नगं पैसे मला,
न्हाय पायजे मोबाईल मला
कॉलेजात जावून वाईट गोष्टीत
ठेवणार न्हाय म्या लक्षण
न्हाय गं आई नगं
तोडू व मावं शिक्षण ।।२।।

ह्या समाजाच्या ह्रदयामध्ये,
अन्यायाची कळ हाय
ह्याच अन्यायाला तोंड द्यायला,
शिक्षणच एक बळ हाय
पोरगा आसल हुशार,
तर पोरगीपण वाघीन हाय
मायलेकीचं अतुट ठेवणार
हाय म्या बंधन
न्हाय गं आई नगं
तोडू व मावं शिक्षण
गुलामगीरीचं आपुलं जीवन,
आसं आपुन समजतो
डॉ. आंबेडकरांचे इचार हे,
विसरून जातो
हेच लिहितांना कागद पेन संपतो
ह्या कवितेद्वारे आई देते तुला मी वचन
न्हाय गं आई नगं
तोडू व मावं शिक्षण

**– कु. रंजना पंडीत दोडे**
बी. ए. १

# माये बाबा

हुंदक्याच्या गळ्यांना
दिले एक गाण तू
पुन्हा एकदा फुंकलास
प्राणायामात प्राण तू
वाळवंटात गवसलेला
तू निर्मळ झरा
भोंदूच्या गर्दीत
तूच एक 'बाबा' खरा
तुझ्यामुळे उमलले
वेदनेच्या राणी फुल
अन् त्याच्या सुगंधाने
ती सावध झाली भूलं
तुझ्यामुळे दुःख सारे
बघ झाले तळीपार
सुखानेही उघडले
न ठोठावताच दार

**परमेश्वर शेजोळे (महाराज)**
बी. ए. 2

# शेर शायरी

१) मागो उसीसे जो दे खुशीसे
ना कहे किसीसे
२) जो पहाड़ से टकराते है।
उसे तुफान कहते है
और जो तुफानो से टकराते है।
उसे नौजवान कहते है ।

**–भुषण शरदराव खुमकर**
बी. कॉम. २

# आई

आई,
मायेचे माहेर
संस्काराची धार
वास्त्यल्याच मंदिर
आई,
पाखरांची चाहुल
मुलाचं पहिलं
पाऊल सवस्वाची उकल
आई,
माफीचे भंडार
प्रेमाचे उदर
घराचा आधार
आई,
कैवल्याचा झरोका
आनंदाचा झोका
घराचा ठोका
आई,
सर्वस्व अर्पण
मुलाच दर्पण
जळणार तर्पण
आई,
ममत्वाचे दान
लेकराचे स्पंदन
झिजणार चंदन
आई,
सुखाची पहाट
आनंदाची लाट
फुलांची सुगंध वाट

**–विठ्ठल सु. खेडकर**
बी. कॉम. २

# असा कसा विसरला

सर्वात वेगळं अस तिचं अस्तित्व
अरे! माणसा जाण रे तिचे महत्व
स्वतः वेदना घेवून हे जग तुला दाखवले
तरी सुद्धा माणसा तू तिला
नाही ओळखले ।।धृ।।

स्वतःच्या घासातला घास
तुले तिने चारला
स्वतः लुगडं घालते फाटके,
तुला नवीन ड्रेस शिवला
पायाला चटके बसतात
पण चपलाचा जोड तुला दिला
एवढे आईचे उपकार
तू असा कसा विसरला ।।१।।

तुला मायेचा हात दिला
तुझा लाड तिने केला
लुगड्याच्या पदरात
घास तुला बांधला
तुला लागताच काही धक्का
काळजाला लागला
तरी सुद्धा माणसा
तू असाकसा विसरला ।।२।।

निंदतांना तिला तुझी चिंता वाटत होती
पोरगं आपलं रडत असेल
ह्याच विचारात होती
तिनं कोसावरून दुध
पाजाया पळत आली ती जन्मदाती
सैरावैरा जीव तिचा धावला,
असा कसा तू विसरला ।।३।।

मुलगा शाळेत जातो
तिच्या जीवाले रे काचन
तुझ्या वही पेनासाठी
ती काड्याकुड्या वेचन
वेचताना काड्याकुड्या
काटा बोटाला टोचला
घळाघळा रक्त वाहीले
एवढे तरी तू विसरला ।।४।।

कामावरूनी येताच
भाकर तुला भाजून देई
तुला घास भरूनी उपाशी
पोटी निजे तुझी आई
दिवसभर काम करूनी
रात्री झोप तिला नाही येई
मायेचा हात तुझ्या डोक्यावर दिला.
तरी सुद्धा माणसा तू विसरला ।।५।।

उन्हाचे चटके स्वतः सहन करते
स्वतःच्या सावलीत तुलारे बसवते
तू सुखी रहा एवढेच देवाला मागते
रात्रंदिवस रे तुला जीव तिने लावला ।।६।।

आई तुझ्या या उपकाराला
कोणाची उपमा देता येत नाही
सातजन्म तरी केली
सेवा उपकार फेडू शकणार नाही
आकाशाएवढा घेतला कागद
समुद्राएवढी शाही
आई तुझे उपकार लिहायला
बसलो तर लिहल्या जात नाही ।।७।।

**–संजय ह. चव्हाण**
बी. कॉम १

# ओठावरील हास्य


ओठावरील हास्य अशी दावते कशाला
डोळ्यापासून आसवे
अलग करते कशाला?
आसवांचा संबंध जन्मोजन्मीचा
विलग करते कशाला
हृदयात उमललेली शब्दफुले
तुझीच मांडी होती ती
माझ्या उशाला.
आसवांचा एक थेंब स्पर्श
करून गेला माझ्या गालाला
समाजाची रीत आहे
दुःख मनी धरते कशाला?
साजणी अशी खंत का?
लावून घेते मनाला
हसरा तुझा तो चेहरा
मलीन का झाला?
पूर्वीचा तो चेहरा
पाहू दे तू मला दे

**विठ्ठल सु. खेडकर**
बी. कॉम. २

# शेर शायरी

गम इस बात का नही
की घर जल गया
गम इस बात का है की
दिया घरकाही था

**– भुषण शरदराव खुमकर,**
बी.कॉम. २



# गणित आयुष्याचे

गणित प्रितीचे मांडले
सूत्रास त्यास बांधले
रीत जुळवीत गेलो
उत्तर बरोबर आलेच नाही
बेरीज वजाबाकी केली
शुन्य आले.
गुणाकार भागाकार केला
शुन्यच आले
रीत मात्र बदलली
ताळा आयुष्याला जुळलाच नाही
अपूर्ण घातांक
सारेच देवून पाहीले
आकडेमोड केली,
पण
रीत कधी जुळलीच नाही.
गणित मला जमले नाही.
आयुष्याचे
दोन शब्द कधी
प्रेमाचे मिळालेच नाही

**विठ्ठल सु. खेडकर**
बी. कॉम. २

# मैत्री

थकलेले जीव सारे
सावलीला निजले होते
बाभळीचे झाड घराशी
फुलांनी सजले होते
पाखरांनी आपले घरटे
छपराला टांगले होते
भातकूलीचे डाव दारी
खेळ सारे मांडले होते
तेव्हा उमगले ते घर
माझ्या मित्राने बांधले होते.

# प्रेमगण

दरवेळी भेटायला येतांना तुझा
बहाना नवा असतो
आपल्या दोघांच प्रेम फुलवणारा
तो सुंदर असा दुवा असतो
मुरद्र म्हणजे
युद्धात आणि प्रेमात
सर्व काही माफ असत
पण भेटीसाठी जाताना
खोटं बोलण पाप असत

**– सुरेश लोणाग्रे**
बी. ए. १

# एस. एम. एस.

१) पैसे मिळवण्यासाठी माणूस आरोग्य
गमावतो नंतर गेलेले आरोग्य
मिळविण्यासाठी कमावलेले पैसे गमावतो.

२) ज्यानी अनियतीने धन संपत्ती प्राप्त केले
आहे त्याची प्रशंसा करू नका?

३) अभी नही तो कभी नही.

४) मुश्कील राहे भी आसान हो जाती है
हर राह पर पहचान हो जाती है
जो लोग मुस्कुराके करते है सामना
किस्मत उनकी गुलाम हो जाती है

५) नियती कधी लाच घेत नाही
या जन्मातच हिशोब रोकडा
चुकता करावा लागतो

६) एकवेळी शंभर इमानदार शत्रु
चालतील पण एक बेईमान मित्र नसावा.

७) आयुष्याच्या वाटेवर थांबायच नसत
आयुष्याचे पैलतीर गाठायचे असते
नशीब दुसरं कोणी लिहित नसत
आपल नशीब आपल्याच हाती असत
येतांना काही आणायच नसत
जातांना काही न्यायच नसत
मग हे आयुष्य तरी कोणासाठी
जगायचं असत
याच प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी
जन्माला यायचं असत.

**– भुषण शरदराव खुमकर,**
बी.कॉम. २

# निसर्ग

पाखरांचे पायी काट्यांचे पैजण
भारूड भजन वाळवंटी....
सोसाट्याचा वारा गर्जते गजर
हलावी पद वेलीचाही ...
दुःखाचे डोंगर सुखाचा कळस
वाट ही डोळस चोखाळली....

एकच घनवटी आकाशी निनाद
पक्षीही साद घालताती...
धरती उसासे उमटे रानोरानी
प्राजक्त फुलांनी

— **विठ्ठल सु. खेडकर,** बी. कॉम. २

# मोकाट गोर

चार मन तूर
पाच मन भुसा
जाऊन पोलिस पाटलाले पुसा.
पोलिस पाटील असा ना तसा
अमर खराटे न पकडला ससा
सस्याले नाही रगत ना फगत
भुषण दाभाडे देवीचा भगत
देवीले नाही फुल ना फकडी
शिवा देशमुखने वागवीली कुत्री
कुत्री ले नाही दोर ना फोर
पंकज नरोळे मोकाट गोर
गोऱ्या नाही नाथ ना फात
राहुल खेर्डेने उचली गात

— **भुषण शरदराव खुमकर,** बी.कॉम.2

# दारिद्रयाची माळ

पेटेना चूल हो भागेना भूक हो
घरामधी टाहो भाकरीसाठी ....
भुकेच्या अग्नित होरपळले पोट
थरथरले ओठ अन्नासाठी....
पोटासाठी वणवण फिरतो दाही दिशा
आता पाहवेना दशा जीवनाची
गरीबीचे चटके असह्य भारी
जणू ती आरी लाकडावरची...
किती सोसावी कळ राहिलेना अंगी बळ
दारिद्रयाची माळ माझीया गळा

— **भुषण शरदराव खुमकर**
बी.कॉम.2

# हा - हा

गण्या दारू पिऊन घरी येतो
वडिलांना संशय येऊ नये म्हणून
लॅपटॉप उघडून बसतो
थोड्या वेळाने
गणनगर
वडील : गण्या दारू पिऊन आलास का?
गण्या : नाही हो बाबा !!
वडील : मग माझी सुटकेस उघडून
काय टाईप करतोस?

—**भुषण शरदराव खुमकर**
बी.कॉम. २

# सावित्रीबाई

सावित्रीबाई तू दिले नसते स्त्रियांना शिक्षण
तर काय झाले असते आज या समाजाचे लक्षण?
आजही समाजात कुठ महिलांना सन्मान आहे
स्त्रिला प्रत्येक ठिकाणी समाजात दुय्यम स्थान आहे
स्त्रिला संपवण्यचा कट रोज शिजत आहे
स्त्री भ्रूणहत्या सर्वदूर दररोज होत आहे.
जन्माच्या आधीच दिले जावे स्त्रिला मरण्याचे इंजेक्शन
सावित्री आई तू दिले नसते स्त्रियांना शिक्षण
महिलांवर अत्याचाराच्या घटना दररोज घडतात
हुंड्यासाठी कित्येक नववधू घरो घरी जळतात
शिक्षण घेवून तू अबला नारीला केले मर्दानी
म्हणूनच घरोदारी झाली आता झाशींची राणी
महात्मा फुलेंच्या हातातून तू घेतले होते प्रशिक्षण
सावित्री आई तू दिले नसते स्त्रियांना शिक्षण,
तर काय, आज हा देश महिलांनी सांभाळला असता?
इंदिराजी सारखी प्रधानमंत्री भारताला मिळाली असती
मंत्री, राष्ट्रपती, महिलांना तू बनवले राज्यपाल
डॉक्टर, इंजिनिअर, पायलट, वकील होवून
तुझ्या शिक्षणाने स्त्रिचा बदलला हाल
स्त्री शक्तीने मिळवले पन्नास टक्के आरक्षण
सावित्री आई तू दिले नसते स्त्रियांना शिक्षण
स्त्री शिकली समाज सुधारला घरदार सुधारले
गोरगरीबांच्या लेकरांनीही आज शाळेचे रस्ते धरले
सावित्री आई तुझ्या शिक्षणाने जग बदलून टाकले.
महिलांनी चंद्रावर जाऊन आज चंद्रालाही झाकले
तुझ्या शिक्षणाची सवित्रीआई अशी आहे किंमत
सूर्यालाही झाकण्याची आहे आज महिलांमध्ये हिंमत
संसार चालवण्याची किमया प्रत्येक स्त्रिमध्ये विलक्षण
सावित्री आई तू दिले नसते स्त्रियांना शिक्षण
तर काय? झाले असते आज या समाजाचे लक्षण?

**–हिवराज शा. वाकोडे**
बी. ए. २

# अशीच आहे मी

खरचं मी कशी आहे
मनाला प्रश्न पडतो नेहमी
विचार केल्यावर उत्तर मिळतं
अशीच आहे हो मी ।।१।।

तशी मी आहे बरीच बोलकी
सारखी बडबडत असते
पण नवीन कोणी भेटलं
की माझी दातखिळ बसते ।।२।।

आपल्याच कोषात गुरफटायला
मला फार आवडत
गर्दी गोंधळ असला की
कासव व्हायला परवडतं ।।३।।

मी हसते नेहमी खुप
जीवनाचा आनंद घेते
खास पण राग येतो जास्त
करते व्यक्तिमत्वाचा ऱ्हास ।।४।।

आहे आत्मविश्वासाची कमी फक्त
करू शकते मी काम काही
सारखी मनात भिती असते
मला आहे जमेल की नाही ।।५।।

माहीत नाही मला खरचं
चांगली की वाईट मी
मात्र मी माझ्याशी प्रामाणिक
अशीच आहे हो मी।।6।।

—**भारती ठाकरे,** बी. ए. २

# मैत्री

मैत्री मध्ये एक प्रेम असते
ते साठवून ठेवणे आपले कर्तव्य असते
त्यामधये सर्वकाही माफ असते
अशी ही एक प्रेमळ मैत्री असते.

मैत्री म्हणजे मायेची आठवण असते
मनाने मनाला दिलेली प्रेमाची साठवण असते
मैत्रीचे नाते कधी तुटत नसते
अशी ही एक प्रेमळ मैत्री असते.

मैत्रीमध्ये मैत्रीणीला चांगला मार्ग दाखवणे
हे आपले कर्तव्य असते
त्यातच आपल्या मैत्रीचे यश सफल होत असते
मैत्रीमध्ये भेदभाव पाळायचा नसते
अशी मैत्री टिकून राहत असते
अशी ही एक प्रेमळ मैत्री असते.

मैत्री म्हणजे एक विश्वास आहे
तो विश्वास कधी तोडायचा नसतो
यातच मैत्रीचे खरे प्रेम दडलेले असते
त्याच विश्वासाची किंमत ठेवणे
हाच मैत्रीचा सन्मान असते
अशी ही एक प्रेमळ मैत्री असते.

आयुष्याच्या वेलीवर मैत्री ही एकदा होत असते
पण ती सोडतांना खुप दुःख भोगावे लागते
मैत्री ही आयुष्यातून दूर जाते.
परंतु मनामध्ये मैत्रिणीच प्रेम साठवलेल असते
तिच्यापासून दूर जातांना दुःख नकोसे वाटते
अशी ही एक प्रेमळ मैत्री असते.

—**कु. अनिता सिरस्कार,**
बी. ए. २



# का हो पुढारी

का आले दारी ?
का हो पुढारी
आश्वासनासाठी की आसनासाठी?
ठेवून विश्वास दिले मत
तुम्हा मिळाले पद
लोकशाहीसाठी
की हुमुमशाहीसाठी?
घेतले अधिकार
अन् भ्रष्टाचार
नैतिकतेसाठी
की अनैतिकतेसाठी?
का हो पुढारी
शेवटी दिल्यानं हाती तुरी
विश्वासासाठी
की पुढच्या
अविश्वासासाठी?
आता होवून नेता?
देशाला कुठे नेता?
प्रगतीसाठी की
अधोगतीसाठी ...?

**– भुषण शरदराव खुमकर**
बी.कॉम.

# पांढर सोनं (कापूस)

सुरू आहे चर्चा प्रत्येक खेड्यागावात
घेत आहेत कापूस व्यापारी माती भावात.
औषधी, खत
बियाणे महाग
कापूस का बर स्वस्त?
शेतकऱ्यांकडे कानाडोळा
सरकार भ्रष्टाचारात व्यस्त
प्रत्येक वस्तूचे वाढले भाव
आजवर वाढतच गेले
शेतकऱ्याच्या कापसाचे
कां बर भाव कमी केले
शेतीला लाजणाऱ्या
साहित्यावर.
येथे खुपच वाढली महागाई
शेतीतून निघालेल्या कापसाला
कां बरं येथे भाव नाही?
याला कोण आहे दोषी
कोणाचे घ्यावे नांव
सरकारच आहे कारणीभूत
नाही देत कापसाला भाव

**– भुषण शरदराव खुमकर**
बी.कॉम. २

# ध्येय गठण

विद्यार्थी हा राष्ट्राचा कणा आहे. परंतु सध्याच्या काळात विद्यार्थांसमोर असंख्य समस्या असलेल्या आढळूनयेतात. समस्त विद्यार्थी दिशाहीन झालेले दिसतात. त्यातील तुम्ही पण एक झोपेतून उठा ध्येय ठरवा आणि प्रयत्नरत राहा.

ध्येय ठरवतांना हे लक्षात ठेवा ध्येय हें मोठे असावे, लहान नाही. जर उर्त्तीर्ण होण्याचे ध्येय असेल तर नुसते जेमतेम कमी मार्कचि ठेवू नको ते जास्त मार्काचे असावे. जीवनात आव्हान हे स्विकारले पाहीजे त्यासाठी व्हा बेभान आणि स्विकारा आव्हान.

मित्रांनो, आपल्यापैकी काही श्रम करून यशस्वी होतात तर काही नशिबावर अवलंबून राहतात. जर तुम्ही नशीबावर अवलंबून राहणार असाल तर तुमचे काही खरे नाही लक्षात ठेवा, नशीब आपल्याला बदलत नाही पण आपण नशिबाला बदलू शकतो. आता सकारात्मक विचारसरणी ठेवून आळस झटकून उत्साहाने प्रेरित होवून कृतीला लागा. वाटेत अपयश आल तर समजून चाला यशाची पहीली पायरी ओलांडली. कारण अपयश ही यशाची पहिली पायरी आहे.

**आधार देईल माया,**
**बदलेल जीवनाची काया**
**विसरू नका आई—बाबा,**
**घालू नका जीवन वाया**

हे विसरू नका जर यश मिळवायचे असेल तर प्रयत्न करतांना लक्षात ठेवा कोणाकडून ही मदतीची अपेक्षा ठेवू नका, मात्र दुसऱ्याला मदत जरूर करा. आपल्या मनाशी एक वाक्य कायम कायम ठेवा. ठरल, मी निर्णय घेतला आहे. मी ध्येय गाठणाराच.

यशस्वीतेसाठी महत्वाचे असते व्यक्तीमत्व विकास. व्यक्तीमत्व म्हणजे काय ? असे वाटत असेल तर लक्षात ठेवा असते ज्यास महत्व, तेच खरे व्यक्तीमत्व, स्वतः एक महत्व व्यक्ती बना, समाजात प्रतिष्ठा मिळवा. व्यक्तीमत्व बनवायचे असेलतर च आचरण सुधारा चांगल्या व्यक्तींच्या सहवासात रहा. कोणतेही कार्य करायचे असेल तर आत्मविश्वास फार महत्वाचा आहे. विश्वासाने आत्मविश्वास मिळत असतो.

नैराश्य, चिंता, लज्जा, भिती हेच आत्मविश्वासाचे मूळ शत्रू आहेत. हे सर्व भावनांचे खेळ आहेत. आत्मविश्वास प्रबळ करण्यासाठी रामबावण उपाय म्हणजे एकच वाक्य 'यशस्वी होईपर्यंत प्रयत्न करेल' नेहमी आशावादी राहा मनप्रसन्न व उत्साहीत ठेवा. चिंता, निराशा, मनातून काढून टाका.

ध्येयाच्या दृष्टीने नियोजन करा व त्यासाठी चांगल्या सवयी लावून घ्या. एक वेळापत्र बनवा त्यानुसार स्वतःला घडवा. चांगल्या सवयी ध्येय गाठण्यास पोषक असतात. पुस्तकवाचन, नियमित व्यायाम करणे, आजचे काम आजच करणे ह्या चांगल्या सवयी ओत.

७ तास झोप, ४ तास अभ्यास ६ तास कॉलेज, ५ तास दैनिक काम, २ तास व्यायाम, खेळ = २४ तास. ध्येय जवळ येत असतांना 'आता एकच ध्यास करणार मी प्रामाणिकपणे अभ्यास, अभ्यासकला शिकून घ्या, स्मरणशक्ती वाढवा, भाग्यापेक्षा प्रयत्न महत्वाचे तेही सतत अपयश आले तरीही, तरच तुम्ही यशस्वी व्हाल कारण. 90 टक्के प्रयत्न + 10 टक्के भाग्य = 100टक्के यश. प्रयत्नानेच ध्येय गाठता येते.

**—गणेश शेजोळे,** बी. कॉम. १

## My Father

Time changes every second
Every minute, every hour
Time changes - people change
But some remains ours
And some do not change
For your better
Just like my father
I have seen two people living in him
Changing in him
Changin him from a man with a scooter
To a person with a motorcar;
From a person with a box house
To a person with two apartments
A person going for quantity clothes
To a person going for quality labelled
clothes.
Seen a person with old watch
To a person with branded watch
He changed fo rus - THE FAMILY
I even saw him a person caring for family
And now I still see him,
caring much more for us
This thing didn't change '
He is GREAT

FRIENDSHIP IS THE
HEAVIESTSCOININTHE
INTERNATIONAL BANK
OF LOVE
WITH UR FRIENDSHIP
I AM THE RICHEST
PERSON ON EARTH
SO KEEP ME
RICH 4 EVER

Sharda S. Parekar
B.A. II

# कुसुमाग्रजांची विशाखा या काव्यसंग्रहातील राष्ट्रविषयक कविता

प्रा. डॉ. विनोद नामदेव इंगळे
मराठी विभाग प्रमुख,
ग.भि.मुरारका महाविद्यालय, शेगांव



'विशाखा' हा कुसुमाग्रजांचा म्हणजेच वि.वा. शिरवाडकरांचा १९४२ सालामध्ये प्रकाशित झालेला काव्यसंग्रह आहे. कुसुमाग्रजांच्या नावावर जळपास अकरा काव्यसंग्रह आहे. या सर्व संग्रहांमध्ये 'विशाखा'चे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. या संग्रहातील सर्व कविता ह्या १९३२ ते १९४५ या एकूण नऊ वर्षांच्या काळातल्या आहेत. हा कालखंड म्हणजेच पारतंत्र्याचा कालखंड होता. एकीकीकडे देश परकियांच्या हातामध्ये गेलेला होता. म्हणजे आपला देश हा पाश्चात्यांच्या मगरमिठीत सापडला होता. तर दुसरीकडे देशातील समाज हा स्वतःच्या श्रेष्ठ-कनिष्ठत्वाच्या अर्थहीन बडबडीमध्ये गुंतला होता. देशांतर्गत निर्माण झालेला संघर्ष संपण्याच्या दृष्टीने अनेक प्रतिभावंत गुंतलेले होते, याचे चित्र त्यांच्या 'विशाखा'मधून स्पष्ट होते.

कुसुमाग्रजांना लहानपणापासूनच वाचनाची प्रचंड आवड होती. समाजाचे प्रत्यक्ष वाचन करता-करता इतिहास वाचनाचा छंदही त्यांनी जपला होता. त्यातूनच त्यांची इतिहासाकडे पाहण्याची एक दृष्टी तयार झाली होती. याचे प्रत्यंतर त्यांच्या 'सात' नावाच्या कवितेमधून येते. असे असले तरी, कुसुमाग्रजांनी केवळ एकाच एक विषयाला धरून कविता केल्या नाहीतर तर, त्यांच्या 'विशाखा' या काव्यसंग्रहामध्ये सामाजिक, राष्ट्रविषयक, प्रेमविषयक, निसर्गविषयक आणि व्यक्तिविषयक असे वैविध्य दिसून येते. परंतु ज्या विषयाला कुसुमाग्रज हाताळायला सुरूवात करतात त्यात, ते अत्यंत खोलवर गढून गेलेले दिसून येतात. एकाचवेळेस त्याच्या कवितेचा संबंध हा केशवसुताच्या सामाजिक, निसर्गविषयक प्रेमविषयक कवितांशी जोडता येतो. ज्या पोटतिडकीने केशवसुतांनी सामाजिक विषमतेवर कडवे प्रहार केले अगदी तिच भूमिका कुसुमाग्रजांची आपल्या संग्रहामध्ये दिसून येते.

प्रत्येक माणूस हा जन्मतः स्वतंत्र असतो. त्याचे ते स्वातंत्र्य कोणीही हिरावून घेऊ शकत नाही. ते हिरावून घेण्याचा प्रयत्न होत असेल तर, त्या विरोधात पेटून उठणे हे आपल्या जिवंतपणाचे लक्षण असते. अगदी तसेच आपला देश पारतंत्र्यात अडकलेला असताना, कुणाला समाधानाची झोप

घेता येईल? असा प्रश्न आपल्या राष्ट्रविषयक कवितामध्ये कुसुमाग्रज उपस्थित करतात. १९२० नंतर स्वातंत्र्याची चळवळ आणखी गतीमान होते. त्याचप्रमाणे ब्रिटिशांच्या अत्याचाराचे स्वरूपही गंभीर, व्हायला सुरुवात होते. याच काळात कुसुमाग्रज शब्दांची, विचारांची मशाल हाती घेऊन दिशा दिशांमधला अंधार नाहीसा करण्याचा प्रयत्न करतात. त्यांच्या कवितेचा विषय या देशातील तरूण असतो. त्याच्या मनात देशाप्रती असणारे अपार प्रेम असते. असाच तरूण कुसुमाग्रजांच्या राष्ट्रविषयक कवितेचा नायक आहे. त्याच्या चित्रणातून एक नेमका संदेश ते ब्रिटिशांच्या अन्यायी प्रवृत्तीला देतात. सोबतच अत्याचाराचा मुकाबला करण्यासाठी नवी पिढी उभी राहावी असा दुहेरी विचार कुसुमाग्रज आपल्या कवितेमध्ये करताना दिसून येतात. 'क्रांतीचा जयजयकार' या कवितेमध्ये ते म्हणतात

'श्वासांनों जा वायूसंगे ओलांडूनी भित
अन आईला कळवा अमुच्या हृदयातील खंत
सांगा वेडी तुझी मुले ही या अंधारात
बध्द करांनी अखरेचा तुज करिती प्राणिपात
तुझ्या मुक्तिचे एकच होते वेड परी अनिवार'

आपल्यापेक्षा देश महत्त्वाचा आहे ही भावना उदात्त मूल्यांची जाणीव करून देते. कुसुमाग्रजांनी ती नेमकी पकडून आपल्या कवितेमध्ये मांडली आहे. जन्मदात्री आणि मातृभूमी ह्या दोन्ही प्रतिमा अत्यंत बेमालूमपणे येत जातात. क्रांतिकारकांच्या मनामध्ये असणारी मातृभूमिबद्दलची कर्तव्याची जाणीव आणि त्या जाणिवेपोटी स्वतःला मृत्यूच्या दारात लोटण्याची दुर्दम्य तयारी कुसुमाग्रजांना अत्यंत महत्त्वाची वाटते. केवळ एकामुळे स्वातंत्र्याचे स्वप्न पूर्ण होऊ शकत नाही. त्यासाठी सर्वांनी आपापल्या परीने, स्वतःला मातृभूमीसाठी अपर्ण केले पाहिजे. तरच पुढची पिढी ही अत्यंत मुक्तपणे स्वातंत्र्यात श्वास घेऊ शकेल. त्याकरिता वीरमातांनीही देशाच्या स्वातंत्र्यासाठी कामी येणाऱ्या आपल्या वीर पुत्रांच्या बलिदानाची कुठलीही खंत बाळगण्याची गरज नाही. हे कवी कुसुमाग्रज सांगतात. जुलमी राजवटीला आव्हान देण्याचे सामर्थ्य या क्रांतीकारकांमध्ये आहे. मरणाची भीती त्यांच्या अंतःकरणातून केव्हाच निघून गेल्याचे संदर्भ या कवितेमध्ये येऊन जातात. 'जालियनवाला बाग' या कवितेमध्ये ते म्हणतात,

'रक्ताचे नच ओघळ सुकले अजुनि क्रुसावरच
विरले ना ध्वनि तुझ्या प्रेषिता, अजुनी शब्दांचे
मंगल तव गीतांचा होतो मंदिरात घोष
प्रेम शांती अन क्षमा यामध्ये बसतो परमेश!'

मानवी सत्तासंघर्षाचे क्रूर रूप आणि प्रभू येशूचा संदेश परस्पर भिन्न आहे. येशूने हिंसेचा कधी स्विकार केला नाही. चांगल्या वाईटाचा संघर्ष कुसुमाग्रज या कवितेमध्ये मांडतात. आपले म्हणणे मांडण्याचा नैसर्गिक अधिकार असतानाही, त्याला जेव्हा अमानुषपणे चिरडून टाकल्या जाते तेव्हा, माणसांच्या मृत्यूदारातील केवळ किंकाळ्या ऐकू येतात. 'जालियनवाला बाग हत्याकांड' ब्रिटिशांच्या अमानवी प्रवृत्तीचे किळसवाणे दर्शन घडविणारी भयानक घटना आहे. जिचा विचार इतिहासामध्ये नमूद आहे. याची जाणीव कुसुमाग्रजांची कविता करून देते.त्याचप्रमाणे त्यांची 'कोलंबसाचे गर्वगीत' ही कविताही व्यक्तिच्या ठिकाणी भरून राहिलेल्या आशावादाचे सुंदर वर्णन करते.

'मार्ग आमुचा रोधू शकती ना धन, ना दारा
घराची वा वीतभर कारा
मानवतेचे निशान मिरवू महासागरात
जिंकूनी खंड खंड सारा'

मानवी मनात निर्माण झालेली चिड जी अन्यायाच्या संदर्भातील आहे. ती या ओळींच्या रूपाने व्यक्त होते. सामाजिक किंवा राष्ट्रीय असंतोष कुसुमाग्रजांच्या नजरेतून सुटू शकत नाही. त्याला नष्ट करण्यासाठी कोलंबसवृत्ती त्यांना महत्त्वाची वाटते.

कुसुमाग्रजांना लहानपणासूनच वाचनाची खूप आवड होती. त्यांच्या वाचनाच्या कक्षेमधून इतिहास हा विषयही सुटू शकला नाही. अशाच काही ऐतिहासिक घटनांची नोंद कवी कुसुमाग्रज आपल्या विशाखेमध्ये करतात. 'जा जरा पूर्वेकडे' आणि 'सात' या दोन कवितांमधून स्वामीनिष्ठा आणि संताप याचे अनोखे दर्शन घडते, ब्रिटिशांच्या सत्तेचा एकीकडे धिक्कार करीत असतानाच आपल्या देशाच्या, मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी प्रसंगी जिवावर उदार असणारी पिढी उभी राहिली पाहिजे यासाठीचा विचार कुसुमाग्रज मांडतात.

'तेथ देखा आग वेगाने विमाने वर्षती
थोर शस्त्रांची गती!
धूळ आणि अग्नि यांच्या दौलती चोहिकडे
जा जरा पूर्वेकडे!'

कुसुमाग्रजांची कविता ही मानवतेच्या वैश्विक जाणिवा व्यक्त करते. माणसांनी माणसांच्या सुरक्षेच्या आणि सुविधेच्या अंगाने लावलेले शोध त्यांच्या अंगलट येऊन मानवतेचा अवमान कसा होतो आहे हे चीन, जपान युध्दात चाललेल्या अमानुष अत्याचाराच्या वर्णनातून सांगतात. तर याच्या विपरित स्वाभिमानाखातर प्रसंगी आपल्या प्राणांची आहुती देणारे मराठा वीर 'सात' या कवितेमध्ये उभे करतात.

'खालून आग, वर आग, आग बाजूंनी
समशेर उसळली सहस्त्र क्रूर इमानी
गर्दीत लोपले सात जीव ते मानी
खग सात जळाले अभिमानी वणव्यात
वेडात मराठे वीर दौडले सात'


सेनापती प्रतापराव गुर्जर यांना आपल्या जबाबदारीचा पडलेला विसर व त्याचा शिवाजी महाराजांनी घेतलेला समाचार व त्यातून अस्मितेची जाणीव होऊन प्रतापराव गुर्जर आपल्या सहा सरदारांसह शत्रूच्या छावणीत शिरतात. घनघोर लढाईमध्ये ते कामी येतात. असे एकंदरीतच दृश्य वाचकांसमोर कुसुमाग्रज उभे कतात. अर्थात स्वातंत्र्याच्या चळवळीमध्ये प्राणपणाने लढणाऱ्यांना योध्दांना प्रेरणा मिळावी हा सुध्दा दृष्टीकोन कुसुमाग्रजांचा आहे.

कुसुमाग्रजांच्या 'विशाखा' या काव्यसंग्राच्या एका विशिष्ट कप्प्यामधून राष्ट्रविषयक कविता ही उभी राहते, असे म्हणण्यापेक्षा ती उभी करणे ही काळाची गरजही त्यांना वाटते. इंग्रजी सत्तेच्या पारतंत्र्याच्या जुलमी बेड्यांना तोडण्याची एक ऊर्मी तत्कालीन तरूणांच्या मनामध्ये निर्माण झाली होती. याची जाणीव कुसुमाग्रजांना होतीच. देशासाठी प्रसंगी आपले सर्वस्व अर्पण करायला तयार झालेला तरूण त्यांना मोठा वाटू लागतो. त्याचे हे मोठेपण कुसुमाग्रज एवढ्या जोरकसपणाने मांडतात की, वाचकही भारावून जातो. एवढे सामर्थ्य त्यांच्या राष्ट्रविषयक कवितेमध्ये आहे.

● ● ●

# राष्ट्रसंत तुकडोजींचे अलौकीक कार्य

प्रा. डॉ. विलास एम. डेहणकर
इतिहास विभाग प्रमुख,
ग.भि.मुरारका महाविद्यालय, शेगांव



राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे द्रष्टे क्रांतीकारी संत होते. शुक्रवार दि. 30/04/1909 रोजी अमरावती जिल्ह्यातील यावली येथे वडील श्री. बंडोजी अर्थात नामदेव गणेशपंत इंगळे ठाकुर ब्रम्हभट व माता मंजुळादेवी यांच्या पोटी हे रत्न जन्माला आले. तुकडोजी महाराजांचे जिवन अलौकीक होते. गुरुमाऊली परमहंस श्री आडकोजी महाराज यांच्या कृपाप्रसादाने शुन्यातुन साकार झालेले ते होते. प्राथमिक शाळेत दुसर्या वर्गात असतांनाच पाटी फोडून साधुसंतांच्या शाळेत ते दाखल झाले आणि ध्यान, भजन, खंजेरी वादनाचा तन्मयतेने अभ्यास सुरु केला. पुर्णकिशोरावस्था रामटेक, चिमुर, नेरी, गोंदोळा इ. भागातील घनदाट अरण्यात हिंस्त्र पशुंच्या सानिध्यात तपस्या करीत व्यथीत केली. पुढे वयाच्या 21 व्या वर्षी जंगलातुन बाहेर पडुन जनता जनार्दनाच्या सेवेत ते रुजु झाले. देव भक्तीवर आधारीत उत्स्फुर्त भजनांची रचना खंजेरीच्या खणखणाटाच्या पार्श्वध्वनीत उच्च पहाडी आवाजात श्रृतीमधुर भजनांचे गायन व त्या माध्यमातुन समाजप्रबोधन आणि राष्ट्रजागरण त्यांनी सुरु केले.

भारतीय स्वातंत्र्य संग्रामाला प्रोत्साहान दिले त्यामुळे ब्रिटीशांनी 28 ऑगष्ट 1942 ला चंद्रपूर चार्तुःमासात त्यांना अटक केली आणि नागपूर जेलमध्ये तुरुंगवासात टाकले. तेथे भक्तांच्या भेटी वाढल्या त्यामुळे त्यांना 21 सप्टेंबर 1942 ला रायपुर जेल मध्ये रवाना केले. 2 डिसेंबर 1942 ला तेथुन त्यांची सुटका झाली.

महाराज यांनी सोबतच श्री गुरुदेव सेवामंडळाची स्थापना आणि नवसमाज निर्मीतीसाठी ठिक ठिकाणी आश्रम, सेवाश्रमांची

उभारणी केली. माणसाला माणूस.... अज्ञानी यास 'ज्ञानी'....., निरक्षरास 'साक्षर'......, बेकारास 'उद्योगी'......, दुर्जनास 'सज्जन'..... , नास्तिकास 'आस्तीक'....., भाविकास 'भक्त' ......., देवभक्तास 'देशभक्त'....... व देशभक्तास ते 'देवभक्त' करीत होते. देशात आणि विदेशात त्यांनी भ्रमण केले. टोकीयो, जपान येथे विश्व शांती संमेलनामध्ये त्यांनी भारताचे प्रतिनिधीत्व केले व तेथे त्यांना सभेच्या अध्यक्षपदाचा मान मिळाला होता.

त्यांच्या जिवनात साध्या खेडुतापासून तर राष्ट्रपिता महात्मा गांधी व राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्या समान महापुरुषांपर्यंत तसेच भोळ्याभाबड्या भाविकांपासून तर वैराग्यमुर्ती श्री संत गाडगे बाबा आणि 160 वर्ष वयाचे महान योगीराज स्वामी श्री सितारामदासजी महाराज यांच्याशी त्यांचा अतिनिकटचा संबध आला. गल्ली ते दिल्ली पर्यंत त्यांच्या चाहत्यांची यादी बनविल्यास महाभारतापेक्षा मोठ्या ग्रंथाची संभावना, अन त्यात कितीतरी विदेशीप्रेमी जनांचा समावेश असू शकतो येवढे त्यांचे कार्य उत्तुंग होते.

उच्चशिक्षीतांसमोर तो एक फार मोठा आदर्श आहे. त्यांचा ग्रामगिता ग्रंथ घराघरातल्या देव्हार्यात ठेवण्यासारखा पुजनीय आहे. त्यांचे उत्तुंग कार्य पाहुन राष्ट्रपती राजेंद्रजी प्रसाद यांनी तुकडोजी महाराजांच्या कार्याचा 'आप संत नही, आप तो राष्ट्रसंत हो' या शब्दांत गौरव केला.

'विश्व पृष्टं ग्रामे अस्मिन्ननातुरम्'

म्हणजेच गावा गावातील ही सर्व जनता निरोगी, धष्टपृष्ट व सुखी असो. या ऋग्वेदातील ऋचेने त्यांनी ग्रामगितेची सुरुवात केली. आणि ही ग्रामगिता झोपडीत राहणार्या शेतकर्याला, कष्टकर्याला त्यांनी अर्पण केली. संपूर्ण आयुष्य ग्रामिण भागात फिरुन दृष्ट रुढी, प्रथा, परंपरा यावर प्रहार करून अहोरात्र कार्य केले. भुदान चळवळीत कार्य केले, अनेक मंदीरे अस्पृश्यांना खुली करुन दिली. दि. 11/10/1968 रोजी दुपारी 4.58 ला त्यांनी आपला देह ठेवला.

'तुकड्या कहे आँधी लाऊँ । मै भी मरकर जी जाऊँ', हा संकल्प घेवून ते शांत झाले. सर्वांचे जिवन सुखी व्हावे यासाठी त्यांचा ग्रामगिता ग्रंथ हा बहुउपयोगी आहे म्हणून हा घरा घरा पर्यंत पोहचला पाहीजे हीच त्यांची इच्छा होती. त्यांचा तो आर्त संदेश होता. महाराज म्हणत

जे कोणी माझे स्नेही प्रेमळ ।  
त्यांनी करावा ग्रंथाचा सुकाळ ।  
घरोघरी चालवावा प्रचार निर्मळ ।  
ग्रामगीता वाचनाचा।।

आपल्या लोकांचे कर्तव्य आता हेच असू शकते की, ह्या वाड्मयाला करोडोमुखी व कानी जाऊ द्यावे, हजारो भाविकांत ती भक्ति वाढवावी आणि त्या वाड्मयाची जी किर्ती आहे, ती स्वार्थपुर्तीसाठी न पसरविता 'परोपकारः पुण्याय, पापाय परपिडनम्' ह्या प्रवृत्तीने समजुन घेतली पाहीजे वाढविले पाहीजे.

जय गुरु !

# महाविद्यालयीन व्यवस्था

**डॉ. व्ही. के. गायकवाड,** राज्यशास्त्र विभागप्रमुख

महाविद्यालयीन व्यवस्था अनेक घटकांचा समूच्चय होय. या मुल्यात्मक घटकांना निश्चित स्वरूपात बांधण्याची जबाबदारी प्रत्येकाची ठरते. कारण या व्यवस्थेशी संबंधित प्रत्येकाला या व्यवस्थेमूळे सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त होते. म्हणूनच विद्यार्थ्यांच्या साहित्यातून निर्माण होणारा हा वार्षीक अंक असल्याने महाविद्यालयीन व्यवस्थेतील तत्वांचा उहापोह करण्याचा हा प्रांजळ प्रयत्न.

- मानवसंसाधन मंत्रालय, भारत सरकार आणि विद्यापीठ अनुदान आयोग यांच्या धोरणात्मक निर्णयातून चालणारी व्यवस्था.
- व्यवस्थापन मंडळाच्या मार्गदर्शना खाली चालणारी व्यवस्था.
- महाविद्यालयीन कर्मचारी, प्राचार्य, विद्यापीठांचे कुलगूरू, राज्यपाल (कुलपती) आणि राष्ट्रपती अशी उच्च शिक्षणाची नियंत्रणात्मक जबाबदारीची व्यवस्था.
- महाविद्यालयीन रथाची दोन चाके, एक कर्मचारी आणि दुसरा विद्यार्थी, यांच्या समतोल प्रयत्नातून चालणारी व्यवस्था.
- प्रत्येकाची जबाबदारी निश्चित करणारी व्यवस्था.
- थोरांचे मुल्यात्मक विचार आणि संवैधानिक मूल्य रुजविणारी व अंमलात आणणारी व्यवस्था.
- कला गुणांना वाव देवून व्यक्तिमत्वाचा विकास करणारी व्यवस्था.
- विद्यार्थ्याला कौटूंबिक आणि सामाजिक जबाबदारी पेलण्याची ताकद देणारी व्यवस्था.
- विद्यार्थी व कर्मचाऱ्यांच्या सर्वांगीण विकासाची व्यासपीठीय व्यवस्था.
- मूल्य शिकविणारी व जोपासणारी व्यवस्था.
- सर्वधर्मसमभावाची आणि राष्ट्रीय एकात्मतेची शिकवण देणारी व्यवस्था.
- समाजातील जेष्ठांचा आणि गुरुजनांचा आदर शिकविणारी व्यवस्था.

- शैक्षणिक जबाबदारी सोबतच सामाजिक जबाबदारी पेलण्याची ताकद देणारी व्यवस्था.
- राष्ट्रीय उपक्रमांमध्ये सहभाग नोंदविणारी व्यवस्था.
- निवडणूकांच्या माध्यमातून लोकशाही मूल्ये जोपासणारी व्यवस्था.
- संस्कार रुजविणारी व्यवस्था.
- स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांना मार्गदर्शक ठरणारी व्यवस्था.
- विद्या देवतेची ज्ञानसाधना व आराधना ज्या ठिकाणी शांत चित्ताने व एकाग्रतेने घडते ती ग्रंथालयीन व्यवस्था.
- राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जोपासणारी व स्वयंसेवकांना कार्यप्रवण होण्यास उद्युक्त करणारी व्यवस्था.
- क्रीडा विभागाच्या माध्यमातून शारीरिक विकास आणि क्रीडाविषयक ज्ञान देणारी व्यवस्था.
- राष्ट्रीय छात्रसंघाच्या माध्यमातून राष्ट्रप्रेम, देशसेवा, शिस्त, प्रमाणिकपणा, त्याग, समता व बंधूता शिकविणारी व्यवस्था.
- वृक्ष लागवड आणि संवर्धनाच्या माध्यमातून पर्यावरण संतुलनाच्या दिशेने प्रयत्न करणारी व्यवस्था. ' जागतिकिकरण आणि तंत्रज्ञान युगात सर्व समावेशक ज्ञान देणारी व्यवस्था.
- शैक्षणिक व सामाजिक उपक्रमांची नॅकद्वारे मूल्यांकन होणारी व्यवस्था.

या सर्वांनी बहरलेला वटवृक्ष म्हणजेच महाविद्यालयीन व्यवस्था होय. अशी व्यवस्था निर्माण करणे आणि ती टिकविणे ही आपल्या सर्वांची नैतिक जबाबदारी ठरते.

## करोनाची करनी

कावं बेबे, यमुने, दारके
कसं साल आलं,
करोनानं तं यंदा
भलकाईच केलं.


किती माणसं मारते आता
काय आहे त्याच्या मनात,
घरदार सोडून लोकं
चालले आता वनात.

आता लोक ग्या कधी
असं नाही पाह्यलं,
पाणी पाऊस असून
झाड उभ्यानच वायलं.

घरात राहून माणूस
गुदमरून राहिला,
बाहेर निघाला तं
करोना मारून राहिला.

धाकी पडला माणूस
काही खरं नाही राहिलं,
जीव मुठीत धरून
नुसतं जगणं उरलं.

प्रा.गणेश वाघ शेगाव



## कोरोनाची भीती

आता माणसाला माणसाची
किंमत समजून राहिली,
म्हणून त्याले गरिबावर
दया येऊन राहिली.

मरण काय असते हे त्याला
आता समजून राहिले,
म्हणून काही माणसं आता
माणसासारखे वागून राहिले.

न दिसणारे जीव माणसांचा
जीव घेऊ शकतात,
मोठाले रथी–महारथी
यांच्यासमोर नांगी टाकतात.

आता हे असंच संकट
पुढे येत राहणार,
माणुसकी नाही राहिली तर
पशु–पक्षी तर सोडा मुंगी
जिवंत नाही राहणार..

प्रा. गणेश वाघ शेगाव

## संसाराचा गाडा

तुमाले तं वाटते
मी रोज खेयते गोया,
आज मी करते भाजी
तुमी लाटा पोया.
सांडोया– कुरडयाच्या
वक्ती तुमी गेले पवून,
साच्या दाबू दाबू
माये हात गेले गवून.
बरं झालं धुनी –भांडी
करायला नाही लावत,
इतकी काम करायला
येते का तुमची सवत?.
बायाइचे नवरे तं
कर्रऽऽ लांबून रायले,
रोज टीव्ही, मोबाईलवर
किस्से दाखवून रायले.
मीच होय की तुम्हाला
पाणी हातात देते,
उसक काम सांगितलं
तं जीवावर कावून येते.
एकाच्या ओढीनं गाडा
चालत नसते,
धूर्जड झालं की बैल
आपोआप बसते.
लावून खांद्याला खांदे
घेऊ हातात हात,
येऊद्या कितीही संकटं
करू त्याच्यावर मात.

**प्रा. गणेश वाघ शेगाव.**

# मराठी विभाग अहवाल
# सत्र २०२१-२०२२

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाने,महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी दिलेल्या निर्देशानुसार बी.कॉम. च्या विद्यार्थ्यांचा मराठी विषयाचा अभ्यासक्रम मार्च महिन्यात पूर्ण करण्यात आला.कोरोनाचा वाढता प्रभाव व संसर्ग लक्षात घेता शासनाने 23 मार्च पासून संपूर्ण भारतभर 'लॉकडाऊन' करण्यात आले त्यानुसार संचारबंदी सुद्धा लागू करण्यात आली. त्यानुसार महाविद्यालय बंदचे आदेश आले आणि 'WORK FROM HOME' पद्धतीने महाविद्यालयीन कामकाज सुरू झाले. विद्यार्थी प्राध्यापकाचा प्रत्यक्ष संबंध संपुष्टात येऊन सोशल मीडियाद्वारे इंटरनेट द्वारे विद्यार्थी प्राध्यापकांमध्ये विचार विनिमय सुरू झाला.

कोरोनाचा वाढता संसर्ग भयावह होत होता.प्रत्येक प्रसार माध्यमाद्वारे कोरोनाची लागण कमी होण्यासाठी प्रचार केल्या जात होता म्हणून यापासून आपण दूर दूर राहण्यासाठी कशी काळजी घ्यावी यासाठी सोशल मीडियाद्वारे व्हाट्सअप ग्रुपवर कविता तयार करून प्रबोधनाचे काम यादरम्यान केले त्याचबरोबर विद्यार्थ्यांच्या समस्या ऑनलाईन पद्धतीने सोडविण्यात आल्या.फोन द्वारे , इंटरनेट द्वारे यांना माहिती देण्यात आली मार्च ते मे ,जून हा कार्यकाळा परीक्षांचा आहे परंतु राज्यात सर्वत्र संचार बंदी असल्यामुळे विद्यार्थ्यांची परीक्षा संदर्भात संभ्रमावस्था निर्माण झाली ती दूर होण्यासाठी विद्यापीठाकडून तसेच महाविद्यालयाकडून परीक्षा संदर्भात आलेली माहिती व सूचना विद्यार्थ्यांना सोशल मीडियावर देण्यात आली.

बी.ए. 1 व 2 ची परीक्षा रद्द झाल्यामुळे केवळ अंतिम वर्षाची परीक्षा होण्याचा निर्णय झाल्यामुळे अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या व्हाट्सअप ग्रुप वर परीक्षे संदर्भातील माहिती प्रश्नपत्रिकेचे स्वरूप अभ्यासक्रमाची ध्वनिमुद्रणे पाठविण्यात आले, त्यांच्या अडचणी सोडविण्यात आल्या.

बी.ए. 2 व 3 च्या नियमित प्रवेशित विद्यार्थ्यांचे प्रवेश पूर्ण झाल्यानंतर ऑनलाइन पद्धतीने तास घेण्यात आले.

बी.ए. अंतिम वर्षाच्या ऑनलाइन/ऑफलाईन उ.बु. पद्धतीने परीक्षा घेण्याच्या विद्यापीठाच्या निर्णयानंतर प्रश्नपत्रिका तयार करणे,परीक्षा घेणे, पर्यवेक्षक म्हणून काम करणे, मूल्यांकन आणि ऑनलाइन पद्धतीने गुणांकन करणे इत्यादी कामे व्यवस्थितपणे करण्यात आली.

दिनांक २७ फेब्रुवारी २०२२ रोजी प्रसिद्ध मराठी साहित्यिक वी वा शिरवाडकर यांच्या जयंती दिना निमित्ताने मराठी भाषा दिनाचा कार्यक्रम घेण्यात आला.

## Report 2021-2022
## English Department

The English department created whatsapp groups for the students to provide them important information related to syllabus, class, assignment, exam etc. Online classes conducted on zoom app for the academic year 2021-22. The department of English organised "Online Quiz Competition on Chhatrapati Shivaji Maharaj" on 19 February 2022 for the students. The students of the English department actively participated in the Annual Gathering Programme of the College. They presented Mime on "Save Tree Save Environment ". A Chinese proverb says," Tell me and I'll forget; show me and I may remember; involve me and I'll understand."

This involvement was incorporated in the students through various activities such as Presentations, Classroom Seminars, Reading Skills, Unit Tests, Viva etc. were organised by the English department during 2021-2022. The English department arranged a group discussion on the topic "Women and their Backwardness in India" for the students of B.A.part I. The department of Englisht arranged seminars and group discussions of students of B.A. and B.Com classes for the purpose "To enhance ability to collect and process information aimed at certain subjects.

Assistant Professor Ku. Namrata S. Rajgure (Head of English Department) participated in Online Two - Week Interdisciplinary REFRESHER COURSE on "Advanced Research Methodology " from 22/03/2022 to 05/04/2022, conducted by Teaching Learning Centre Ramanujan College, University of Delhi. The department completed the syllabus of B.A. Part I,II,III and B.Com Part I,II,III for the academic year 2021-22. Viva and assignments of the students were taken after completing the syllabus on the Zoom app and offline mode. The department actively participated in university examinations which were conducted in online and offline mode.

**Ku. Namrata S. Rajgure,**
Head of English Department,
G.B.Murarka Arts and
Commerce College,
Shegaon,Dist.Buldana.

# इतिहास अभ्यास मंडळ अहवाल
# २०२१-२०२२

दि. 09/12/2021 ला सेठ ग.भि.मुरारका कला व वाणिज्य महाविद्यालय, शेगांव येथे इतिहास विभागाच्या वतिने शैक्षणिक सत्र 2021–2022 करीता इतिहास अभ्यास मंडळाची स्थापना करण्यात आली. या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून मराठी विभाग प्रमुख प्रा. व्ही.एन. इंगळे हे होते, तर प्रमुख उदघाटक म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य अनिलकुमार राठोड हे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमापुजनाने झाली. या नंतर कार्यक्रमाचे प्रास्ताविक इतिहास विभाग प्रमुख प्रा.डॉ. विलास डेहणकर यांनी केले. आपल्या प्रास्ताविकामध्ये त्यांनी इतिहास अभ्यास मंडळाच्या स्थापने मागील उद्देश स्पष्ट केला. या प्रसंगी उदघाटक म्हणून लाभलेले प्राचार्य डॉ. अनिलकुमार राठोड यांनी अशा अभ्यास मंडळांची महाविद्यालयांमध्ये गरज का आहे? हे विद्यार्थ्यांना स्पष्ट करुन सांगीतले. क्रमीक अभ्यासक्रमाव्यतिरिक्त विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्वाचा सर्वांगीन विकास व्हावा या दृष्टीकोनातुन महाविद्यालयातुन अशा प्रकारची अभ्यासमंडळे स्थापन केली जातात असे त्यांनी सांगीतले. या प्रसंगी त्यांनी इतिहास अभ्यास मंडळाची कार्यकारणी जाहीर केली. त्यानूसार खालील विद्यार्थ्यांची नियुक्ती करण्यात आली.

| अ.क्र | विद्यार्थ्याचे नांव | वर्ग | पदनाम | मोबाईल नंबर |
|---|---|---|---|---|
| 01 | अजय देवराव डोंगरे | बी.ए.भाग–3 | अध्यक्ष | 7517361325 |
| 02 | तेजस अनिल दाभाडे | बी.ए.भाग–3 | उपाध्यक्ष | 9529848050 |
| 03 | श्यामसुंदर रविंद्र धनोकार | बी.ए.भाग–2 | सचिव | 9529127623 |
| 04 | ज्ञानेश्वर वामन काळे | बी.ए.भाग–2 | सहसचिव | 9325599513 |
| 05 | पायल संजय सावळे | बी.ए.भाग–1 | कोषाध्यक्ष | 8080642902 |
| 06 | स्वाती भिमराव साळवे | बी.ए.भाग–1 | सदस्य | 9322059956 |
| 07 | निखील लक्ष्मण ढगे | बी.ए.भाग–1 | सदस्य | 9021316056 |
| 08 | रविकिरण लक्ष्मण निंबाळकर | बी.ए.भाग–1 | सदस्य | 9529595055 |
| 09 | रोशन गौतम इंगळे | बी.ए.भाग–1 | सदस्य | 7620288386 |

# राज्यशास्त्र विभाग वार्षिक अहवाल
# सत्र - २०२१-२२

राज्यशास्त्र अभ्यास मंडळ सामाजिक बांधिलकी स्वीकारून विविध कार्यक्रमांचे आयोजन करीत असते.

**1) निबंध स्पर्धा –**

आजादी का अमृत महोत्सव अंतर्गत राज्यशास्त्र विभाग, राष्ट्रीय सेवा योजना, ग्रंथालय आणि आयक्यूएसी यांच्या संयुक्त विद्यमाने " भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात महात्मा गांधीजींचे योगदान " या विषयावर निबंध स्पर्धेचे आयोजन दि. 02 ऑक्टोबर 2021 केले. प्रथम द्वितीय व तृतीय पुरस्कार प्राप्त स्पर्धकांना रोख रक्कम व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

**2) मिशन युवा स्वास्थ अंतर्गत covid–19 लसीकरण कॅम्प –**

सईबाई मोटे सामान्य रुग्णालय शेगाव आणि राज्यशास्त्र विभाग, राष्ट्रीय सेवा योजना व आयक्यूएसी यांच्या संयुक्त विद्यमाने दि. 11, 25 व 30 ऑक्टोबर 2021 असे तीन दिवस तीन लसीकरण कॅम्प घेऊन जागतिक महामारी काळात सहभाग नोंदविला.

**3) मतदार नोंदणी अभियान –**

मा. मुख्य निवडणूक अधिकारी महाराष्ट्र राज्य यांच्या निर्देशानुसार तहसीलदार तथा सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी शेगाव यांच्या दि. 27/10/2021 च्या पत्रानुसार नोडल अधिकारी म्हणून छायाचित्रासह मतदार यादीचा विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रमात सहभाग.

**4) संविधान दिन आणि मतदार नोंदणी कार्यक्रम –**

राज्यशास्त्र विभाग, राष्ट्रीय सेवा योजना आणि आयक्यूएसी यांच्या संयुक्त विद्यमाने संविधान दिन आणि मतदान नोंदणी कार्यक्रमाचे आयोजन केले. यावेळी मार्गदर्शक श्री समाधान सोनवणे तहसीलदार, शेगाव यांनी मार्गदर्शन केले यावेळी ऑनलाइन मतदान नोंदणीकरिता बीएलओ उपस्थित होते.

**5) मतदार दिन –**

25 जानेवारी मतदार दिनानिमित्त राज्यशास्त्र विभाग आणि तहसील कार्यालय, शेगाव यांच्या संयुक्त विद्यमाने " भारतीय लोकशाहीत मतदारांची भूमिका या विषयावर निबंध स्पर्धेचे आयोजन. दि. 24 जानेवारी 2022. प्रथम व द्वितीय पुरस्कार प्राप्त विद्यार्थ्यांना तहसील कार्यालयातर्फे

प्रमाणपत्र देऊन सन्मानित.

**6) राष्ट्रीय मतदार जागृती स्पर्धा –**

भारत निवडणूक आयोग यांच्या निर्देशानुसार राष्ट्रीय मतदान जागृती स्पर्धा अंतर्गत पोस्टर स्पर्धा घेण्यात आली. कु प्रणाली शेगोकार बी. ए.भाग–3 या विद्यार्थिनीने बनविलेले पोस्टर आयोगाच्या संकेतस्थळावर पाठविण्यात आले. तसेच तहसील कार्यालय शेगाव द्वारा आयोजित कार्यक्रमाच्या आयोजन आणि नियोजनामध्ये सहभाग. दि. मार्च 2022

**7) जागतिक महिला दिन –**

जागतिक महिला दिनी नवमतदार विद्यार्थिनींचा सन्मान कार्यक्रमाचे आयोजन केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तसेच प्रमुख उपस्थिती म्हणून नवमतदार विद्यार्थिनी उपस्थित होत्या. मार्गदर्शकही विद्यार्थिनीच होत्या. या कार्यक्रमाचा युट्यूब व्हिडिओ बनविण्यात आला. दि. 08 मार्च 2022

**8) आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन –**

राज्यशास्त्र प्राध्यापक परिषद, नागपूर (विदर्भ प्रांत) नोंदणी क्र. एफ –35406 (नाग) आणि राज्यशास्त्र विभाग सेठ ग. भि. मुरारका महाविद्यालय, शेगाव यांच्या संयुक्त विद्यमाने ' हवामान बदल आणि बदलते जागतिक राजकारण ' या विषयावर एक दिवसीय बहूविद्याशाखीय राष्ट्रीय परिषद 7 जून 2022 रोजी घेण्यात आली.

श्रीमान सेठ संजयकुमारजी मुरारका संचालक, शेगाव शिक्षण संस्था यांनी परिषदेचे उद्घाटन केले. प्रास्ताविक करताना डॉ. अलका देशमुख अध्यक्षा, राज्यशास्त्र प्राध्यापक परिषद यांनी राज्यशास्त्र परिषदेच्या वाटचालीवर प्रकाश टाकताना वेगवेगळे विषय घेऊन करीत असलेले चिंतन समाजपयोगी ठरते असे मत व्यक्त केले. बिजभाषक श्री जयंत माईणकर सीनियर जर्नालिस्ट, मुंबई यांनी तांत्रिक विकास हा आधुनिक जीवनातील अत्यंत महत्वपूर्ण असल्याने त्याचा त्याग करू शकत नाही, परंतु त्याचा स्वीकार करताना मानवतावादी दृष्टिकोण जोपासण्याची आवश्यकता आहे.

तापमान वृद्धी मानवी जीवनासाठी चिंतनाचा विषय बनला. पर्यावरण संरक्षणात भारताची अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका राहिली, तसेच पर्यावरण आणि राज्यशास्त्र यांचा घनिष्ट संबंध असल्याचे मत श्री रवींद्र सिंग शेरॉन, प्रिन्सिपल करस्पॉंडंट संसद टीव्ही, नवी दिल्ली यांनी मार्गदर्शन करताना व्यक्त केले. यानिमित्ताने मान्यवरांच्या हस्ते जर्नलचे प्रकाशन करण्यात

आले. (Research journey] Impact Factor 6-625 ¼SJIF½ Special Issue & 296A] June& 2022)

उद्घाटन सत्राला डॉ. सुभाष गवई अध्यक्ष, राज्यशास्त्र अभ्यास मंडळ, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ यांची प्रमुख उपस्थिती उल्लेखनीय ठरली. पहिल्या सत्रात मार्गदर्शन करताना डॉ. संदीप तुंडूरवार यांनी जगाचे बदलते राजकारण हा विषय समर्पकपणे मांडला. अध्यक्षस्थानी डॉ. संभाजी पाटील, धुळे तर प्रमुख उपस्थितीत डॉ. दिनकर चौधरी व डॉ. रिता दांडेकर होत्या. दुसऱ्या सत्राचे अध्यक्ष डॉ.वकील शेख तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. मंगेश आचार्य यांनी पर्यावरण आणि जागतिक राजकारणाचा आढावा घेतला. डॉ. नागेश्वर कन्नाके व डॉ. संदीप काळे प्रमुख उपस्थित होते. पेपर सादरीकरण सत्राचे अध्यक्ष डॉ. शरद सांबारे सचिव, राज्यशास्त्र प्राध्यापक परिषद होते, या सत्रामध्ये डॉ संजय वाघ मुंबई यांनी आपली मते मांडली. या सत्राचे प्रमुख अतिथी म्हणून डॉ. नंदाजी सातपुते व डॉ. प्रतिभा भोरजार उपस्थित होत्या.

समारोप सत्राचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ए.ल. राठोड होते. श्री राजेशजी राजोरे बुलढाणा जिल्हा आवृत्ती संपादक यांनी मार्गदर्शन करताना अशा परिषदेच्या माध्यमातून होणाऱ्या चिंतनाची पर्यावरणाच्या दृष्टीने अत्यंत आवश्यकता असल्याचे मत व्यक्त केले. या सत्राचे प्रमुख अतिथी म्हणून डॉ. रतन राठोड, डॉ. राहुल बावगे, डॉ. संजय गोरे उपस्थित होते.

वेगवेगळ्या सत्राचे सूत्रसंचालन डॉ. राजकुमार शर्मा, प्रा.गोपाल राखोंडे, डॉ. विलास टाले, डॉ. नारायण महाजन इत्यादींनी तर आभार डॉ. विनोद गायकवाड, डॉ. रमेश सुरळकर, डॉ. भगवान गरुडे यांनी व्यक्त केले. राष्ट्रीय परिषदेच्या यशस्वितेकरिता सचिव डॉ. विनोद गायकवाड, डॉ.आर. एम. शर्मा, प्रा. निलेश देवर, डॉ. पिंगळे, प्रा. पी. बी. गायकवाड, प्रा.जामोदे, प्रा. कडूकार, श्री. करणकार सर, कु. वाकोडे, कु. झनके, एनसीसी कॅडेट इघोकार व सुरजसे यांनी परिश्रम घेतले. परिषदेकरिता नागपूर, गोंडवाना, अमरावती विद्यापीठासह इतर विद्यापीठातील बहुसंख्य प्राध्यापक व संशोधक विद्यार्थी उपस्थित होते.

# वाणिज्य अभ्यास मंडळाच्या अहवाल
# सत्र २०२१-२०२२

आमच्या महाविद्यालयातील वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांच्या अंगी सुप्त गुणांचा विकास व्हावा यासाठी 'वाणिज्य अभ्यास मंडळ' स्थापन करण्याचे ठरले. त्यानुसार वाणिज्य शाखेतील सर्व विद्यार्थ्यांची सभा शनिवारी दिनांक 13 ऑगस्ट 2021 रोजी घेण्यात आली होती. या सभेत वाणिज्य अभ्यास मंडळाचे गठन करण्यात आले व सर्वानुमते विद्यार्थ्यांची एक कार्यकारणी गठीत करण्यात आली या सभेमध्ये पुढील पदाधिकारी व कार्यकारी सदस्य सर्वानुमते निवडण्यात आले. अध्यक्ष– वैष्णवी महादेव टाले, उपाध्यक्ष–अतुल फुलकर, सचिव–वैष्णवी वाघ वरील प्रमाणे अभ्यास मंडळाचे गठन करण्यात आले. या सभेला प्राचार्य डॉ. ए.एल.राठोड, प्रा. प्रदीप मेश्राम, प्रा. एस. व्ही. अग्रवाल प्रा. डॉ. आर एम. शर्मा उपस्थित होते. सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांची सभा दिनांक 4 सप्टेंबर 2021 रोजी घेण्यात आली. या सभेमध्ये वाणिज्य अभ्यास मंडळाचे उद्घाटन करण्याचे व वर्षभरात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्याचे ठरले.

जी.बी. मुरारका महाविद्यालय वुमन भास्कर यांच्या संयुक्त विद्यमानाने दिनांक 20 डिसेंबर 2021 रोजी 'युवा पिढी दशा व दिशा' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे संचालन प्राध्यापक डॉ. राजकुमार शर्मा यांनी केले व कार्यक्रमात मुख्य वक्ता म्हणून कृष्णकांत तिवारी अकोला, भास्करचे संपादक उपस्थित होते. या कार्यक्रमांमध्ये 300 पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी संवाद साधला. कार्यक्रमात महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. "Career in Banking, Finance and Insurance" Part I या विषयावर My job consultancy, Akola यांचे Creative Priya pote यांच्या कार्यक्रम ठेवण्यात आला होता. कॉमर्स फोरमच्या सर्व विद्यार्थ्यांसाठी दिनांक 20 जानेवारी 2022 रोजी हा कार्यक्रम ठेवण्यात आला होता या कार्यक्रमाचे संचालन प्रा. डॉक्टर राजकुमार शर्मा, अध्यक्ष प्राचार्य राठोड सर, प्रा. प्रदीप मेश्राम हे उपस्थित होते. "ब्वउचमजपजपअम ठंदापदह डवकनसम" च्तंज–प्प डल रवइ ब्वदेनसजंदबल चे क्पतमबजवत बुरुंगले कॉलेजचे डॉक्टर खडसान सर यांच्या कार्यक्रम ठेवण्यात आला होता. यावेळेस विद्यार्थ्यांच्या प्रचंड सहभाग होता, त्यांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना फार लाभदायक ठरले. या कार्यक्रमाचे संचालन प्रदीप मेश्राम यांनी केले तर, अध्यक्ष प्राचार्य डॉ. ए एल राठोड व उपस्थिती प्रा. डॉ. राजकुमार शर्मा होते. हा कार्यक्रम दिनांक 12 फेब्रुवारी 2022 रोजी ठेवण्यात आला होता. यावेळेस सर्व प्राध्यापक तसेच शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. ए. एल. राठोड — प्रा. प्रदीप भा मेश्राम

प्रा. एस व्ही अग्रवाल — प्रा. डॉ. राजकुमार शर्मा

वाणिज्य विभाग

# सांस्कृतिक विभाग

सत्र 2021 – 22

आमच्या ग.भि. मुरारका कला वाणिज्य महाविद्यालय मध्ये प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरिता वेगवेगळे उपक्रम राबविले जातात. त्यासाठी वेगवेगळे विभाग कार्यरत असतात. या विभागांमध्ये सांस्कृतिक विभाग हा एक महत्वपूर्ण विभाग आहे. या विभागांतर्गत वर्षभर महाविद्यालयामध्ये वेगवेगळ्या प्रकारचे कार्यक्रम राबविले जात असतात. विद्यार्थ्यांच्या अभ्यासाबरोबर त्यांच्या शारीरिक, मानसिक आणि बौद्धिक विकासाकरिता वेगवेगळ्या कार्यक्रमांची रूपरेषा निश्चित केली जाते. त्यानुसार वर्षभर कार्यक्रम साजरे केले जात असतात. विद्यार्थ्यांच्या अंगी असणाऱ्या वेगवेगळ्या कलागुणांना त्यांना प्रदर्शित करता यावे हा यामागील सर्वात महत्त्वाचा उद्देश असतो.

दिनांक 22 8 2022 रोजी शेगाव शिक्षण संस्था शेगावचे अध्यक्ष स्वर्गीय श्रीमान सेठ मुरारीलालजी चतरभुजजी मुरारका यांचा पुण्यतिथी कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे आदरणीय प्राचार्य डॉ. अनिलकुमार राठोड सर तसेच शेगाव शिक्षण संस्था शेगावचे सन्माननीय संचालक आदरणीय श्रीमान सेठ संजयकुमारजी मुरारका हे उपस्थित होते.

दिनांक 5 सप्टेंबर 2021 रोजी शिक्षक दिनानिमित्त कार्यक्रमाचे.आयोजन करण्यात आले. यामध्ये विद्यार्थ्यांनी स्वयंशासनाबरोबरच मागतील शिक्षकांचा विशेष सत्कार केला. वर्षभरच्या ज्या शिक्षकांच्या सहवासामध्ये आपण राहतो त्या शिक्षकांसारखे आपल्याला वागता यावे हे लक्षात ठेवून विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या विषयांवर आपले विचार व्यक्त केले.

दिनांक 12 जानेवारी 2022 हा स्वामी विवेकानंद यांचा जन्मदिवस हा राष्ट्रीय युवा दिन म्हणून साजरा करण्यात आला. यामध्ये विद्यार्थ्यांनी वक्तृत्व स्पर्धा,वादविवाद स्पर्धा,काव्य स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, नाट्य स्पर्धा,नृत्य स्पर्धा, पोस्टर्स स्पर्धा इत्यादी स्पर्धांचे आयोजन केले. त्यामध्ये विद्यार्थ्यांनी आपला महत्त्वपूर्ण सहभाग नोंदविला. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य आदरणीय डॉ. अनिलकुमार राठोड तर यांनी या प्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

दिनांक 11 4 2022 रोजी महाविद्यालयामध्ये शेगाव शिक्षण संस्था शेगावचे संस्थापक अध्यक्ष स्वर्गीय श्रीमान सेठ पुरणमलजी मुरारका यांच्या पुण्यतिथी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांना थोरामोठ्यांच्या कार्याची प्रेरणा मिळावी व त्यांच्याकडूनही चांगले कार्य घडावे हा उद्देश ठेवून अशा कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य आदरणीय डॉ. अनिलकुमार राठोड सर तसेच शेगाव शिक्षण संस्था शेगावचे सन्माननीय संचालक आदरणीय श्रीमान सेठ संजय कुमारजी मुरारका हे उपस्थित होते.

दिनांक 14 एप्रिल 2022 रोजी महाविद्यालयामध्ये महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जयंती दिन साजरा करण्यात आला.या कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी आपले विचार व्यक्त केले. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य आदरणीय डॉ. अनिलकुमार राठोड सर तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक गण उपस्थित होते.

प्रा. डॉ. विनोद नामदेव इंगळे
सांस्कृतिक विभाग प्रमुख
ग. भि. मुरारका कला वाणिज्य महाविद्यालय,
शेगाव. बुलढाणा.

सेठ ग. भि. मुरारका कला, वाणिज्य महाविद्यालय, शेगाव

# शारीरिक शिक्षण विभाग
# वार्षिक अहवाल सन २०२१-२२

महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण विभागात विविध उपक्रम राबविले जातात. त्याकरीता साहित्य व विविध प्रकारचे खेळाचे मैदाने उपलब्ध आहेत. त्यात कबड्डी, व्हॉलीबॉल, लांब उडी, उंच उडी, क्रिकेट, बास्केट बॉल, २०० मी. ट्रॅक, टेनीक्वाईट, बुद्धीबळ व टेबल टेनीस इत्यादी मैदाने व त्याला लागणार साहित्य आहेत. या व्यतिरिक्त महाविद्यालयात व्यायामशाळा, डबलबार, सिंगलबार उपलब्ध आहेत. याचेपण प्रशिक्षण देण्यात येते.

दरवर्षी महाविद्यालयाचे संघ व्हॉलीबॉल, कबड्डी, मैदानी स्पर्धा व खो—खो इत्यादी खेळ प्रकारामध्ये अंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत सहभागी होतात. यंदाच्यावर्षी बुद्धीबळ संघ झोन मध्ये तृतीय राहीला. या व्यतिरिक्त व्हॉलीबॉल व क्रिकेट संघाची कामगिरी पण समाधानकारक होती. वैयक्तिक स्पर्धेत अंतर विद्यापीठ स्तरावर बी. ए. प्रथम वर्षाचा विद्यार्थी सुनिल तु. शेगोकार हा १०० मिटर स्पर्धेत तृतीय आला. महाविद्यालयामध्ये कुंपनावर वृक्षारोपणाचा कार्यक्रम राबवला गेला. त्यात मुले व मुले यांचा सहभाग होता. ज्यात कडुलिंबाच्या झाडावर विशेष भर देण्यात आला.

महाविद्यालयात मागील दोन वर्षापासून महाराष्ट्र पोलिस भरतीकरीता मोफत प्रशिक्षण देण्यात येत आहे. यंदा १२ विद्यार्थी पोलिस भरतीकरिता नियुक्त झाले व त्यात ते यशस्वी झाले आहेत. दरवर्षी विद्यार्थ्यांची वैद्यकीय चाचणी घेण्यात येते व त्याचा अहवाल विद्यापीठाला सादर केल्या जातो. त्याचप्रमाणे शारीरिक क्षमता चाचणी घेण्यात येते त्याकरीता विद्यार्थ्यांचा क्रीडांगणावर सराव घेतल्या जातो. ज्यात १०० मी. धावणे, गोळाफेक, दंडबैठक, योगासन इत्यादीचे प्रशिक्षण देण्यात येते व नंतर त्यावर शारीरिक क्षमता चाचणी घेण्यात येते. याचा अहवाल विद्यापीठात पाठविण्यात येतो.

दरवर्षी २६ जानेवारीला झेंडावंदना नंतर योग्य कर्तृत्व केलेल्या व्यक्तीस व विद्यार्थ्यांस पारीतोषिक देवून गौरविण्यात येते. या सर्व कार्याकरिता महाविद्यालयाचे संचालक मंडळ व सदस्य वेळोवेळी मदत करीत असतात. त्यात विशेष म्हणजे महाविद्यालयाचे प्राचार्य राम पांडे सर व श्रीमान सेठ संजयकुमारजी मुरारका यांचे नेहमीच सक्रीय योगदान असते. हे सांगणे काही वेगळे नाही.

**—प्रा. पी. बी. गायकवाड**
शारीरिक शिक्षण संचालक

# ग्रंथालय विभाग अहवाल
# सत्र - २०२१-२२

संत गजानन महाराज यांच्या पावन भूमितील शेगाव शिक्षण संस्था, शेगावचे ग. भि. मुरारका कला वाणिज्य महाविद्यालय ग्रंथालय विभाग शैक्षणिक वर्ष २०२१ –२२ मधील अहवाल सादर करीत आहे. अहवाल वर्षात ग्रंथालय ग्रंथालयाच्यावतीने विविध उपक्रम राबवीले गेले. विद्यार्थ्यांसाठी व प्राध्यापक यांना ग्रंथालयाकडून देण्यात येणाऱ्या सेवा सुविधा यांचाही परिचय वेळोवेळी करून देण्यात आला. मागील काही वर्षापासून ग्रंथालयात e-Resources वापर करण्यासाठी व त्याचा Accessss करणायासाठी सर्व विद्यार्थी व प्राध्यापक यांचे UGC INFLIBNET N-List मार्फत 7500 संशोधन नियतकालीके व 350000 ई–बुक उपलब्ध करून देण्यात आले. त्याचबरोबर उत्तम बुक्स संग्रह करण्यात आला.

**भौतिक सुविधा–**

ग्रंथालयाची इमारत स्वतंत्र असून ती वेगवेगळ्या विभागात विभागली आहे. विद्यार्थी व प्राध्यापक यांना स्वतंत्र अभ्यास कक्ष आहे, मुलींसाठी स्वतंत्र वाचन कक्ष आहे. संदर्भ विभाग ज्यात दर्जेदार संदर्भ ग्रंथ संग्रहित केलेले आहेत. ग्रंथालय संगणकीकरनासाठी Dot.Com Amaravati Library Managemnt software वापरले आहे.

**अ. ग्रंथालय सल्लागार समिती**

1. अध्यक्ष – प्राचार्य, डॉ. ए. एल. राठोड
2. सदस्य – डॉ. व्ही. एम. डेहनकर
3. सदस्य – डॉ. जी. डी. वाघ
4. सदस्य – डॉ. व्ही. के. गायकवाड
5. सदस्य – डॉ. व्ही. एन. इंगळे
6. सदस्य – प्रा. एस. व्ही. अग्रवाल
7. सचिव – प्रा. एन. ए. देवर

## ब. ग्रंथालयातील सेवा व सुविधा

| अ.क. | सेवा | अ.क. | सुविधा |
|---|---|---|---|
| 1 | ग्रंथ देवान घेवाण | 1 | संदर्भ विभाग |
| 2 | संदर्भ सेवा | 2 | नियतकालिका विभाग |
| 3 | नविन दाखल ग्रंथ | 3 | ई–रिसोर्सेस ॲक्सेस सेंटर |
| 4 | रेफरल सेवा | 4 | वाचन कक्ष सुविधा |
| 5 | ग्रंथसुची सेवा | 5 | वेब ओपॅक |
| 6 | वैयक्तिक सेवा | | |
| 7 | प्रतिलिपी सेवा | | |
| 8 | प्रचलित जागरूकता सेवा (CAS) | | |
| 9 | आंतर महाविद्यालयीन देवघेव | | |
| 10 | पोर्टल सेवा | | |
| 11 | इंटरनेट सेवा | | |
| 12 | वाय फाय सेवा | | |
| 13 | ऑनलाईन डॉक्युमेंट डिलिव्हरी बाय व्हाटसॲप | | |

## क. ग्रंथालयातील साहित्य संपदा

1. ग्रंथ – 16353 + 4729 English Medium Commerce
2. नियतकालिके – 12
3. वृत्तपत्रे – 7
4. मॅप – 2
5. सी.डी. – 25
6. ऑडीओ व्ही. – 4

## ड. ग्रंथालय विभागाव्दारे आयोजित उपक्रम

1. ग्रंथालय आणि शारीरिक शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दि. 21 जुन 2021 'आंतरराष्ट्रीय योग दिवस' ऑनलाईन पध्दतीने साजरा करण्यात आला.
2. दि. 12 ऑगष्ट 2021 रोजी ग्रंथालयशास्त्राचे जनक डॉ शियाली रंगनाथन यांची जयंती 'ग्रंथपाल दिन' उत्साहात साजरी करण्यत आली.
3. दि. 15/10/2021 रोजी भारताचे माजी राष्ट्रपती डॉ ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्त ''वाचन पेरणा दिन'' साजरा करण्यात आला.

**4. "स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन"**

दि. 15/12/2021 रोजी ग्रंथालय विभागाच्यावतीने व श्री ज्ञानेश्वर मस्कुजी बुरूंगले महाविद्यालय शेगाव यांच्या संयुक्त विद्यमाने मार्गदर्शक डॉ. पी. सी. डाबरे, जळगाव जामोद महाविद्यालय यांचा "स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन" या विषयावर एक दिवासीय मार्गदर्शनपर कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

**5. ''निबंध स्पर्धा'' आयोजन.**

दि. 04/10/2021 रोजी ग्रंथालय विभागाव्दारे सेठ ग. भि. मुरारका महाविद्यालय, शेगांव येथे '' भारताच्या स्वातंत्र लढयात महात्मा गांधींचे योगदान'' या विशयावर निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यावेळी 68 विद्यार्थ्यांनी यामध्ये सहभाग घेतला. पुरस्कार प्राप्त स्पर्धकांना प्रथम पुरस्कार 501 रूपये व्दितीय पुरस्कार 301/— व तृतीय पुरस्कार 201/— रूपये देण्यात आला. तसेच सहभागी सर्व स्पर्धकांना प्रमाणपत्र देण्यात आले

**6. सांमजस्य करार**

श्री ज्ञा. म. बुरूंगले महविद्यालल, शेगाव येथील ग्रंथालयासोबत पुढील चार वर्षाकरीता दोन्ही ग्रंथालयातील वाचकांना व विद्यार्थ्यांना त्यांना हवा असलेला ग्रंथ किंवा वाचन साहित्य मिळावे हा हेतु साध्य करण्यासाठी ग्रंथालयांनी आपसात ग्रंथ देवघेव तसेच विविध आयोजित कार्यक्रमांचा लाभ विद्यार्थ्यांना व्हावा यासंदर्भात MOU केलेला आहे.




20















